रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २५१
www.ramprahar.com
शनिवार, ३० मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

राऊत आणि आंबेडकरांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी/२
वाशिवली कॉलेजजवळ गांजा विक्री करणाऱ्याला अटक/५
ज्युनिअर मुलांची क्रिकेट निवड चाचणी लोधिवलीला/८

## काँग्रेस नेते संजय निरूपम यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट



**मुंबई** : काँग्रेसचे मुंबईतील नेते संजय निरूपम हे शिवसेनेच्या वाटेवर असल्याची चिन्हे आहेत, कारण त्यांनी नुकतीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याची माहिती शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी दिली. एका मुलाखतीत बोलताना त्यांनी हा खुलासा केला. 'काल बॉलीवूड अभिनेते व काँग्रेसचे माजी खासदार गोविंदा यांचा आमच्या पक्षात प्रवेश झाला, पण त्यांनी निवडणूक लढवणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. संजय निरूपम हे काँग्रेसवर खूपच नाराज आहेत. त्यांनी सौम्य भाषेत काँग्रेसची सर्व उतरवली आहे. त्यामुळे मला वाटते ते येत्या दोन-तीन दिवसांत काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतील. जर ते आमच्याकडे आले तर त्यांचे आम्ही स्वागत करू, पण दक्षिण मुंबईची जागा कोण लढवणार याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेतील,' असेही संजय शिरसाट यांनी सांगितले.

# जागावाटपावरून काँग्रेस आक्रमक

## मित्रपक्षांसमोर न झुकण्याचा पवित्रा; काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतीची तयारी

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपावरून महाविकास आघाडीतील घटकपक्षांमध्ये गेल्या काही दिवसांपासून रस्सीखेच सुरू आहे. काँग्रेस, ठाकरे गट आणि शरद पवार गट यांच्यात सांगली, रामटेक, भिवंडी यासारख्या जागांवरून तणातणी होती. अशातच सांगली लोकसभा मतदारसंघात ठाकरे गटाने अधिकृतरित्या उमेदवारी जाहीर केल्यानंतर काँग्रेस नेत्यांमध्ये नाराजीचा सूर उमटला. आता मित्रपक्षांसमोर झुकायचे नाही असा पवित्रा काँग्रेसने घेतला आहे. त्यामुळे आघाडीतील घटकपक्षांमध्येच काही जागांवर मैत्रीपूर्ण लढती होण्याचे संकेत मिळत आहेत.

महाराष्ट्रातील सांगली, भिवंडी, उत्तर पश्चिम (वायव्य) मुंबई आणि दक्षिण मध्य मुंबई या लोकसभेच्या पाच जागांवरून महाविकास आघाडीत वाद आहेत. महाराष्ट्र काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत ठाकरे गट आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांच्यासोबत आघाडी करण्याचा निर्णय घेतला आहे, पण मित्रपक्षांना जागा सोडून आघाडीची किंमत मोजण्यास ते तयार नाहीत. लोकसभेच्या अशा वादग्रस्त जागांवर मैत्रीपूर्ण लढतीचा निर्णय प्रमुख काँग्रेस नेत्यांनी घेतला आहे. त्याला काँग्रेस हायकमांडनेही हिरवा कंदील दाखवल्याचेही वृत्त आहे.

ठाकरे गटाने १७ जणांची उमेदवारी यादी जाहीर केल्यानंतर काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली. त्यानंतर ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी पलटवार करीत आमच्या दृष्टीने जागावाटपावरील चर्चा संपली आहे. आणखी किती चर्चा करायची, असा सवाल केला होता, परंतु सांगलीसह इतर जागांवर काँग्रेसचा दावा कायम आहे. सांगलीत काँग्रेसकडून विशाल पाटील लोकसभा लढवण्यास उत्सुक होते, मात्र दुसरीकडे ठाकरे गटाने पैलवान चंद्रहार पाटील यांना पक्षप्रवेश देत त्यांना थेट सांगलीतून तिकीट जाहीर केले. तेव्हापासूनच काँग्रेस नाराज आहे. ठाकरेंनी अधिकृत उमेदवार यादी जाहीर करताना त्यांचे नाव समाविष्ट केल्याने काँग्रेस नेत्यांचा तीळपापड झाला आहे. ठाकरेंनी युतीधर्माचे पालन न केल्याचा काँग्रेसचा आरोप केला. महाविकास आघाडीतील या जागावाटपाच्या वादावर तोडगा निघाला नाही तर मैत्रीपूर्ण लढतींची शक्यता आहे.

### या जागांवर प्रामुख्याने वाद

महाविकास आघाडीत काही जागांवरील वाद अद्याप कायम आहे. सांगली, भिवंडी, दक्षिण मध्य मुंबई या अशा काही जागा आहेत, जेथे काँग्रेसने माघार घेण्यास नकार दिला आहे. सांगलीमध्ये ठाकरे गटाने पैलवान चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे, मात्र आमच्याशी चर्चा न करताच ही उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे, असे काँग्रेसचे म्हणणे आहे. भिवंडीच्या जागेचीही हीच स्थिती आहे. भिवंडी जागेसाठी काँग्रेस आणि शरद पवार गट हे दोन्ही पक्ष आग्रही आहेत. येत्या ३१ मार्च रोजी इंडिया आघाडीची बैठक होणार आहे. या बैठकीत काँग्रेसच्या भूमिकेवर काय निर्णय होणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांचे निधन

**अलिबाग : प्रतिनिधी**



शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या, माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी (दि. २९) प्रदीर्घ आजाराने निधन झाले. अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या त्या तीन वेळा आमदार होत्या. १९९९मध्ये तत्कालीन विलासराव देशमुख सरकारमध्ये त्या राज्यमंत्री म्हणून कार्यरत होत्या. रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्षपददेखील त्यांनी भूषविले.

मीनाक्षी पाटील या शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील व माजी आमदार पंडित पाटील यांच्या भगिनी, तर शेकाप नेते आस्वाद पाटील यांच्या मातोश्री होत. १९९२मध्ये मीनाक्षीताई रायगड जिल्हा परिषदेच्या विरोधी पक्षनेत्या बनल्या. त्यानंतर १९९५मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्या अलिबाग-उरण मतदारसंघातून शेकापतर्फे पहिल्या महिला आमदार म्हणून विजयी झाल्या. पुढे १९९९मध्ये आघाडी सरकारमध्ये शेकाप सहभागी झाला. त्या वेळी ज्येष्ठ नेते गणपतराव देशमुख, मोहन पाटील आणि मीनाक्षी पाटील यांना मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. मीनाक्षीताईंनी बंदरे आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे राज्यमंत्रीपद काही काळ सांभाळले होते.

आमदारकीशिवाय रायगड जिल्हा पत्रकार संघ, रायगड बाजार आदी संस्थांवर मीनाक्षी पाटील यांनी काम केले. पत्रकार संघाच्या त्या बऱ्याच वर्ष अध्यक्ष होत्या. त्यांच्यावर पेझारी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, खासदार सुनील तटकरे, माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते, आमदार महेंद्र दळवी, आमदार भरत गोगावले, मिलिंद नार्वेकर, प्रमोद घोसाळकर, सुरेंद्र म्हात्रे, महेंद्र घरत, प्रवीण पुरो, बाबासाहेब देशमुख यांनी मीनाक्षी पाटील यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले.

दरम्यान, मीनाक्षी पाटील यांच्या निधनाचे वृत्त समजताच अलिबाग आणि पोयनाड येथील बाजारपेठा व्यापाऱ्यांनी बंद ठेवल्या होत्या. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

# एआयशी स्पर्धा करायला हवी; पंतप्रधान नरेंद्र मोदींचा बिल गेट्स यांच्याशी संवाद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



प्रसिद्ध उद्योगपती बिल गेट्स यांनी शुक्रवारी (दि. २९) पंतप्रधान नरेंद्र मोदींशी वेगवेगळ्या मुद्द्यांवर संवाद साधला. या चर्चेमध्ये महिला सशक्तीकरणापासून भारतातील तंत्रज्ञानविषयक प्रगतीचाही उल्लेख आला. या वेळी पंतप्रधान मोदींनी सध्या सगळीकडे चर्चा असणाऱ्या एआयचे महत्त्व आणि त्यांचा या तंत्रज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन याविषयी भाष्य करीत एआयशी स्पर्धा करण्याचा सल्ला दिला.

एआयचा वापर लोकांच्या दैनंदिन जीवनात त्यांची मदत करण्यासाठी व्हायला हवा, असे सांगून पंतप्रधान मोदी यांनी, मी काशी-कमिल संगमम असा कार्यक्रम केला. काशीत तामिळनाडूमधील अनेक लोक आले होते. तिथे मी हिंदीतून बोललो, पण तिथल्या सर्व लोकांनी माझे भाषण एआयच्या माध्यमातून तमिळमध्ये ऐकले, अशी आठवण सांगितली.

या वेळी पंतप्रधान मोदींनी मिश्किल टिप्पणी करीत सांगितले की, एआयचे महत्त्व खूप आहे. मी चेष्टेने कधीकधी म्हणतो. आमच्या देशात मातेला अनेक राज्यांत आई म्हणतात. आमच्याकडे मूल जन्माला आल्यावर ते आई म्हणते आणि ए आईही म्हणते.

दरम्यान, एआयचा वापर आपण कसा करायला हवा याबाबत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, एआयचा वापर एखाद्या जादूच्या कांडीसारखा केला, तर फार अन्याय होईल किंवा एआयचा वापर आपल्या आळशीपणाला झाकण्यासाठी केला तर तेही चुकीचे होईल. मला पत्र लिहायचे असेल आणि मी चॅट जीपीटीला सांगितले की मला पत्र लिहून दे, तर ते चुकीचे आहे. आपण तर चॅटजीपीटीशी स्पर्धा करायला हवी. त्याच्याशी वाद घालायला हवा की तू अमुक गोष्ट व्यवस्थित करीत नाही. तू याऐवजी अमुक गोष्ट का नाही सांगितली? आपण एआयच्याही पुढे जाण्यासाठी प्रयत्न करायला हवा.

आमच्याकडे अनेक भाषा आहेत. मी एआयला सांगतो की, या भाषा समजून घे. मी एकदा आमच्या अंतराळवीरांशी संवाद साधण्यासाठी गेलो होतो. तिथे अंतराळवीरांसाठीच्या रोबोटशी मी बोललो. मी वेगवेगळ्या आवाजात बोलत होतो. तरीही तो व्यवस्थित बोलत होता. मग मी त्याचे नाव बदलून बोलायचा प्रयत्न केला, पण तेव्हा त्याने प्रतिसाद दिला नाही. मी त्यांना म्हटले त्याने माझा आवाज ओळखून माझ्याशी संवाद साधायला हवा. मी प्रत्येक वेळी अशी नवनवीन आव्हाने देत असतो, असे मोदींनी सांगितले.

## निवडक

### काँग्रेसला आयकर विभागाची नोटीस, १७०० कोटींचा दंड

**नवी दिल्ली** : आयकर विभागाने काँग्रेस पक्षाला १७०० कोटी रुपयांचा कर भरण्याची नोटीस पाठवली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार प्राप्तिकर विभागाची नोटीस २०१७-१८ ते २०२०-२१ या वर्षासाठी आहे. १७०० कोटी रुपयांच्या रकमेत दंड आणि व्याजाचा समावेश आहे. आयकर विभागाच्या नोटीसमुळे लोकसभा निवडणुकीदरम्यान काँग्रेसच्या अडचणी वाढल्या आहेत.

### खासदार नवनीत राणांनी घेतली केंद्रीय मंत्री अमित शाहांची भेट

**नवी दिल्ली** : लोकसभा निवडणुकीसाठी अमरावती मतदारसंघातून भाजपने उमेदवारी जाहीर केलेल्या विद्यमान खासदार नवनीत राणा यांनी गुरुवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर शुक्रवारी (दि.२९) दिल्लीत जाऊन केंद्रीय मंत्री अमित शाह यांची भेट घेतली. पती आमदार रवी राणा सोबत होते. त्यांनी आम्ही वरिष्ठ नेत्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी आल्याचे सांगितले.



## सुनेत्रा पवार यांनी घेतली ज्येष्ठ निरूपणकार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारींची सदिच्छा भेट



**रेवदंडा, अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सुविद्य पत्नी सुनेत्रा पवार यांनी शुक्रवारी (दि.२९) ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी यांची त्यांच्या रेवदंडा येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या वेळी त्यांच्यासमवेत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे उपस्थित होते.

सुनेत्रा पवार या बारामती लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य उमेदवार म्हणून ओळखल्या जातात. सकाळी अकराच्या सुमारास त्यांचे खासगी हेलिकॉप्टरने साळाव जेएसडब्लू कंपनी येथील हेलिपॅडवर आगमन झाले. या वेळी आमदार अनिकेत तटकरे तसेच पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांनी रेवदंडा येथे प्रस्थान केले.

रेवदंडा निवासस्थानी ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि कुटुंबियांनी सुनेत्रा पवार यांचे स्वागत केले, तर सुनेत्राताईंनी आप्पासाहेबांचे आशीर्वाद घेतले. या वेळी निरूपणकार रायगडभूषण सचिनदादा धर्माधिकारी, राहुलदादा धर्माधिकारी हजर होते. या वेळी पत्रकारांशी बोलताना ही सदिच्छा आणि आशीर्वादपर भेट असल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.

**उरण** : इंडियन ऑईलचा कोप्रोली येथे सी.एस. पेट्रोलियम या नावाने नवीन पेट्रोलपंप सुरू झाला आहे. कोप्रोली गावाच्या नाक्याजवळ सुधीर घरत व सहकाऱ्यांनी सुरू केलेल्या या पेट्रोलपंपाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. उद्घाटन समारंभाला रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस प्रेसिडेंट पी.जे.पाटील, भाजप नेते चंद्रकांत घरत तसेच गोपाळ पाटील, अतुल पाटील, जेएनपीटीचे विश्वस्त रवी पाटील, दीपक ठाकूर, भगवान घरत, नरेश घरत, महेंद्र नाखवा, सुनील मसणे, अमित घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सुधीर घरत व सहकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.








पनवेल : श्री क्षत्रिय घांची समाज रायगडचा होळी मिलन समारंभ शुक्रवारी करंजाडे येथे उत्साहात झाला. या समारंभास भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासमवेत माजी नगरसेवक विकास घरत उपस्थित होते. या वेळी समाजाच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

## विविध प्रवेश परीक्षांच्या वेळापत्रकात पुन्हा बदल

**पुणे** : राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) विविध प्रवेश परीक्षांच्या वेळापत्रकात पुन्हा बदल केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही दिवसांतील हा तिसरा बदल असून सुधारित वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

नव्या वेळापत्रकानुसार एमएचटी-सीईटीतील भौतिकशास्त्र रसायनशास्त्र जीवशास्त्र (पीसीबी)ची परीक्षा २२, २३, २४, २८, २९ व ३० एप्रिल रोजी, तर भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र गणित (पीसीएम) गटाची परीक्षा २, ३, ४, ९, १०, ११, १५, १६, १७ मे रोजी होणार आहे. उपयोजित कला अभ्यासक्रम सीईटी १२ मे, बीए-बीएस्सी बीएड चार वर्षे एकात्मिक अभ्यासक्रम सीईटी १८ मे, पाच वर्षे विधी अभ्यासक्रमासाठीची सीईटी १८ मे, नर्सिंग सीईटी २४ व २५ मे, हॉटेल मॅनेजमेंट पदवी सीईटी २२ मे, बीबीए, बीसीए, बीएमएस, बीबीए सीईटी २७ ते २९ मे रोजी होणार आहे.

## कर्जतमध्ये आढळले प्राचीन खेळाचे कोरीव पट

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील मोठे वेणगावच्या उत्तरेला दहिवली गावाच्या वेशीवरील शेवटची देवता म्हणून प्रसिद्ध असलेल्या जाखमाता परिसरात प्राचीन खेळ मंकाळाचे १८ कोरीव पट इतिहास अभ्यासक आणि संशोधक सागर मधुकर सुर्वे आणि नेत्रा गणेश कनोजे यांनी शोधून काढले आहेत. यामुळे कर्जतच्या इतिहासात आणखी भर पडली आहे.

दहिवली गावाच्या वेशीचा विद्यापीठीय प्रकल्प करीत असताना सागर सुर्वे व नेत्रा कनोजे हे दोघे जाखमाता परिसरात संशोधन करण्यासाठी गेले होते. तिथे त्यांना एका प्रशस्त कातळावर १८ कोरीव पट दिसले. कर्जत तालुक्यातील आतापर्यंतचे सर्वांत मोठे आणि एकाच



जागी इतक्या मोठ्या प्रमाणावर कोरीव पट पहिल्यांदाच मिळाले आहेत. त्यांनी तत्काळ त्यांना पांढऱ्या रंगाने मार्क करून मितेश डागा यांच्याकडून ड्रोन शूट करून घेतले. या मोहिमेत गौरकामथ गावाचे उपसरपंच व इतिहासप्रेमी योगेश देशमुख यांची मोलाची मदत झाली.

सातवाहन काळात हा मार्ग कल्याणच्या बंदरातून कोंढाणे लेणीकडे जाण्यासाठी होता. दोन हजार वर्षांपूर्वी इथून सार्थवाह, बौद्ध भिक्षू व व्यापारी तांडे कोंढाणे लेणीमार्गे घाटमाथ्यावर जात असत. त्याच मार्गावर असलेल्या या प्रचंड मोठ्या कातळावर मंकाळा खेळाचे पट कोरण्यात आले आहेत, असा प्राथमिक अंदाज सागर सुर्वे यांनी वर्तवला आहे. लाकडी मेटाचेसुद्धा ठिकाण शोधण्यात या दोन अभ्यासकांना यश आले आहे. या संबंधी अधिकचे संशोधन करून त्याचा संशोधन पेपर इतिहास परिषदेत मांडण्याचा सागर सुर्वे व नेत्रा कनोजे यांचा मानस आहे.

# राऊत, आंबेडकरांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी

## जागांच्या प्रस्तावावरून वाद काही मिटेना

**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीतील प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीचा प्रवेश आणि जागावाटप यावरून सुरू झालेले वाद थांबायचे नाव घेत नाहीयेत. विशेषतः आंबेडकर आणि ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांच्यात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरूच आहेत. आंबेडकरांच्या वक्तव्याला आता राऊत यांनी प्रत्युत्तर दिले आहे.



संजय राऊत खोटे बोलतात, त्यांनी पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केल्याचा आरोप वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकरांनी केला होता. त्या आरोपांवर संजय राऊतांनी पहिल्यांदाच उत्तर दिले आहे. जागावाटपाची जी काही चर्चा होत होती ती महाविकास आघाडी म्हणून होत होती, ती प्रकाश आंबेडकर आणि माझ्यात होत नव्हती. त्यामुळे मी काही खोटे बोलत नाही. आंबेडकर यांना आम्ही शेवटी अकोल्यासह पाच जागांचा प्रस्ताव दिला होता, ते आमच्यासोबत यावेत असेच आमचे मत होते, असे राऊत म्हणाले.

राऊत यांनी सांगितले की, ही महाविकास आघाडीची चर्चा आहे, शरद पवार होते, उद्धव ठाकरे होते, नाना पटोले होते. त्यामध्ये मी कुठेच नव्हतो. प्रकाश आंबेडकरांना अकोल्यासह चार जागांचा प्रस्ताव होता, त्यामध्ये आमची सीटिंग जागा असलेल्या रामटेकचा समावेश होता. काँग्रेसकडूनदेखील चांगला प्रस्ताव होता. आंबेडकर यांनी महाविकास आघाडीसोबत यावे यासाठी शरद पवार, उद्धव ठाकरे आग्रही होते. शेवटी त्यांना पाच जागांचा प्रस्ताव दिला.

प्रकाश आंबेडकर हे विद्वान नेते आहेत. ते आमच्यासोबत यावेत असे आम्हाला वाटतेय. ३ एप्रिल रोजी महाविकास आघाडीची पत्रकार परिषद होणार आहे. त्या वेळी सर्व मोठे नेते उपस्थित असणार असून सर्व प्रश्नांची उत्तरे दिली जातील, असेही राऊत म्हणाले.

### ‘तुम्ही किमान आहे त्या जागेवर तरी थांबा’

*प्रकाश आंबेडकरांनी संजय राऊत यांच्यावर केलेल्या आरोपांना सुषमा अंधारे यांनी प्रश्न विचारत टीका केलीय. आम्ही १०० पावले पुढे चाललोय, पण तुम्ही किमान आहे त्या जागेवर तरी थांबा, असा टोलाही त्यांनी लगावला. मुंबईला जी सभा झाली तिथे वंचितने उद्धव ठाकरे यांना निमंत्रण का दिले नाही? काँग्रेसशी पटत नाही, पण त्यांना तुम्ही बोलावले. आम्ही आधी चार नंतर पाच जागा दिल्या होत्या. आम्ही १०० पावलं चाललो, तुम्ही आहे त्या जागेवर तरी थांबा. तुम्ही मागे जात असाल तर ही कसली दोस्ती?, असे अंधारे म्हणाल्या.*

# मराठा समाजाच्या बैठकीत हाणामारी

## छत्रपती संभाजीनगरमध्ये दोन गट भिडले

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

राज्य सरकारने अधिसूचना काढून मराठा समाजाला स्वतंत्र १० टक्के आरक्षण दिले आहे, तर दुसऱ्या बाजूला मनोज जरांगे-पाटील मात्र मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे या मागणीवर ठाम आहेत. यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी मराठा समाजाच्या बैठका चालू आहेत. अशीच एक बैठक शुक्रवारी (दि.२९) छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत दोन गट भिडल्याचे पहायला मिळाले.



मराठा समाजाच्या आरक्षणासाठी काही कार्यकर्त्यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये बैठक बोलावली होती. या बैठकीवेळी काही जणांनी एकमेकांवर हल्ला केला. बराच वेळ दोन गटांमध्ये जोरदार हाणामारी झाली. दोन्ही बाजूच्या लोकांनी एकमेकांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

दरम्यान, ज्यांच्यावर हल्ला झाला अशा लोकांपैकी एका कार्यकर्त्याने सांगितले की, मराठा समाजातील काही गरजवंतांनी ही बैठक आयोजित केली होती. मला या बैठकीबाबत एक संदेश मिळाला. त्यामुळे मी इथे आलो, पण काही लोक ही बैठक कोणी आयोजित केली? ही बैठक कोणी बोलावली आहे? असे प्रश्न विचारत आमच्यावर तुटून पडले. काही लोकांची इथे दडपशाही चालू आहे. आम्हाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली.

# मुंबईसह कोकणात उष्णतेची लाट

## राज्याच्या अनेक भागांमध्येही झळा वाढल्या

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील वातावरणात बदल होत आहे. बहुतांश भागात तापमानाचा पारा वर सरकत असून अनेक ठिकाणी तापमान साधारणतः ३५ अंशाच्या पुढे गेले आहे. त्यामुळे नागरिकांच्या अंगाची काहीली होतेय. दरम्यान, महाराष्ट्रात तापमानाचा पारा नेमका का वाढतोय याबाबत ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी एका वृत्तवाहिनीला माहिती दिली.

मार्च ते मे हा तीन महिन्याचा मान्सूनपूर्व हंगाम महाराष्ट्रासाठी भौगोलिक रचनेनुसार वातावरणात एकाकी खूप बदल घडवून आणतो. कोकण किनारपट्टीला समुद्राचा खारा वारा कोकणपट्टीतील अधिवासासाठी दररोज आदळतो. दिवसा व रात्री वाऱ्याची दिशा वेगळी असते. याचदरम्यान पाकिस्तान अफगाणिस्तान आणि राजस्थानच्या भागातून उच्च दाबाची प्रणाली झाली, तर वायव्य दिशेकडून गुजरात, अरबी समुद्रावरून वारे, उष्णता व आर्द्रता घेऊन मुंबईसह संपूर्ण कोकणात सह्याद्रीवर अडकून आदळतात. त्यामुळे उष्णतेची जबरदस्त लाट मुंबईसह कोकणात महाराष्ट्राच्या इतर भागापेक्षा जाणवत असल्याचे हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी सांगितले.

पूर्व मोसमी (मार्च ते मे) हंगामात जेव्हा दोन प्रति-चक्रीवादळे, अथवा प्रति-विवर्ते (अँटीसायक्लोन) किंवा उच्च हवेच्या दाबाचे डोंगर एक अरबी समुद्रात, तर दुसरे बंगालच्या उपसागरात किंवा किनारपट्टीच्या भू भागावर तयार होतात तेव्हा या दोघांच्या मध्ये वाऱ्याची विसंगती (विंड डिसक्नटीनुईटी) तयार होते. म्हणजेच वारे एकमेकांच्या विरुद्ध महाराष्ट्रात तसेच देशाच्या मध्यावर वाहू लागतात. अरबी समुद्राच्या बाजूला उत्तरेकडून दक्षिणेकडे, तर बंगालच्या उपसागराच्या बाजूला दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहतात. या दोघांमध्ये जी निर्वात पोकळी तयार होते तिलाच वारा खंडितता (विंड डिसकन्टीनुईटी) म्हणतात.

वारा खंडितता प्रणालीमुळे समुद्रसपाटीपासून ९०० मीटर उंचीपर्यंत हवेच्या कमी दाबाचा आस हा दक्षिण कर्नाटक ते पूर्व विदर्भापर्यंत पसरला आहे. याची रूंदीही काही किलोमीटरमध्ये आहे. त्यामुळे तिथे वारा शांत असतो. हवेच्या दाबाच्या रेषाचे व वारा दिशांचे जोड क्षेत्र तयार झालेले आहे. त्यामुळे या क्षेत्रात आर्द्रतायुक्त उष्ण हवा लोटली आहे. सौराष्ट्र व कच्छ, उत्तर कर्नाटकात तसेच नैऋत्या राजस्थानात उष्णतेच्या लाटसदृश्य स्थिती जाणवत आहे. म्हणून या पाच दिवसांत महाराष्ट्रात अति नसली तरी उष्णता वाढलेली आहे, असे हवामान तज्ज्ञ खुळ यांनी म्हटले.

# वाशीतील खुनाच्या आरोपींना १२ तासांत अटक

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी पोलीस ठाणे हद्दीत गुरुवारी पहाटेच्या सुमारास कपिल किनारा हॉटेलमध्ये काम करणारा मुकेश उर्फ मंटू कुमार यादव याच्यावर वार करून त्याची हत्या करण्यात आली होती. आरडाओरड ऐकून यादव याला वाचवण्यासाठी आलेल्या सुरक्षारक्षक दिनेश यादववरदेखील वार करण्यात आले होते. पोलिसांनी गतिशील तपास राबवत अवघ्या १२ तासांत गुन्हेगारांना गजाआड केले आहे. मोहमंद अली मुबारक शेख व शहानवाज हानिफ शेख अशी आरोपींची नावे आहेत.



कुमार हा घरी जाण्यासाठी बसची वाट पाहत बसला होता. त्याच्या हातात पिशवी होती. ही पिशवी खेचून पसार होण्याचा प्रयत्न या दोन गुन्हेगारांनी केला, मात्र कुमार याने पिशवी सोडण्यास नकार दिल्याने अखेर त्याच्यावर वार करण्यात आले. यात त्याचा जागीच मृत्यू झाला. दोन अनोळखी व्यक्तींनी दुचाकीवरून येऊन ही हत्या केल्याचे यादव याने त्याच्या जबानीत पोलिसांना सांगितले होते. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वाशी पोलिसांनी तीन वेगवेगळी पथके तयार करण्यात आली, तसेच समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे शाखा करीत होती. पथकाने आरोपींची ओळख पटवण्यासाठी त्यांचा घटनास्थळापासून सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे व तांत्रिक तपासाचा अभ्यास केला. यात गुन्हा हा तीन जणांनी केल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. त्यानुसार पोलिसांनी आरोपीच्या येणाच्या व जाण्याच्या मार्गावर सापळा रचला.

मोहमंद अली मुबारक शेख व शहानवाज हानिफ शेख या दोन आरोपींना गुन्हा करताना वापरलेल्या गाडीसह ताब्यात घेतले. त्यांच्याकडे विचारपुस केली असता, त्यांनी हा गुन्हा त्यांचा मित्र ईमरान याकुब अली शेख यांचे मदतीने केल्याचे सांगितले. त्याबाबत मध्यवर्ती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील शिंदे यांच्या पथकाने ईमरान याकुव अली शेख. यास मालाड, मुंबई येथुन ताब्यात घेतले.

# मूकबधिर बालकाचा खून करणारा नराधम ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

दोन वर्षीय मूकबधीर बालकाचा शरीरसुखासाठी युवकाने खून केल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. मृत बालकाचा मृतदेह मुंब्रा-पनवेल महामार्गालगतच्या किरवली गावाजवळील डबक्याशेजारी सापडला होता. याप्रकरणी नवी मुंबई पोलीस दलाच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी काही तासांत या खून प्रकरणातील मारेकरी युवकाला ताब्यात घेऊन डायघर पोलिसांच्या स्वाधीन केले.

१२ वर्षीय बालकाच्या बेपत्ता प्रकरणी डायघर पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा नोंदविला होता. तळोजा पोलिसांना बालकाचा मृतदेह सापडल्यानंतर त्यांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली होती.

तळोजा पोलिसांसोबत नवी मुंबई पोलिसांचे गुन्हे अन्वेषण विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील शिंदे यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक दशरथ विटकर, श्रीनिवास तुंगेनवार, हर्षल कदम, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मंगेश वाट, हवालदार नितिन जगताप, पोलीस नाईक सचिन टीके, अशोक पाईकराव यांचे पथक घटनास्थळी बालकाच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी चौकशी करीत होते. दोन वर्षीय मूकबधीर बालकाचा खून शरीरसुखासाठी युवकाने केल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे.

# सावरकरांवरील सिनेमासाठी मनसे आक्रमक

## नाशिकच्या चित्रपटगृहात प्राइम टाइमसाठी आंदोलन

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकचे भूमिपूत्र असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या चित्रपटाला मल्टिप्लेक्स चित्रपटगृहात प्राइम टाइम मिळावा, या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने कॉलेज रोडवरील चित्रपटगृहात शुक्रवारी (दि.२९) आंदोलन करण्यात आले. आंदोलनाची दखल घेत चित्रपटगृहाच्या व्यवस्थापकांनी वरिष्ठांशी संपर्क साधून हा चित्रपट संपूर्ण वेळ चित्रपटगृहात प्रदर्शित होईल, अशी व्यवस्था केली आहे.




सावरकरांच्या जीवनावरील चित्रपट नाशिकमध्ये मल्टिप्लेक्स चित्रपटगृहात सुरू आहे. या चित्रपटाला चित्रपटगृह व्यवस्थापन योग्य वेळ देत नव्हते. सरकारच्या नियमानुसार, या चित्रपटाला १२ ते ३, ३ ते ६, ६ ते ९, ९ ते १२ असा प्राइम टाइम द्यायला हवा होता. त्या अनुषंगाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने चित्रपट मल्टिप्लेक्स मालकांना तंबी देण्यात आली.

स्वातंत्र्यवीर सावरकर या चित्रपटास प्राइम टाइम दिला नाही, तर आंदोलन करण्यात येईल आणि जो काय परिणाम होईल, त्याची जबाबदारी चित्रपट व्यवस्थापनाची असेल असा इशारा देण्यात आला होता. मनसेची मागणी विचारात घेऊन नाशिकमधील सर्व मल्टिप्लेक्स थिएटरमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर चित्रपटाला प्राइम टाइम मिळण्याबरोबर एकूण सहा शो सुरू झाले आहेत.

# कासार्डे बौद्ध विकास मंडळाचा स्नेहमेळावा उत्साहात

**सिंधुदुर्ग : रामप्रहर वृत्त**

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या कणकवली तालुक्यातील कासार्डे या गावात कासार्डे बौद्ध विकास मंडळ (मुंबई/ग्रामीण) मंडळाच्या मुंबईस्थित सभासदांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहाने नुकताच रेडिमर चर्च, दादर येथे दिपक लाडोबा जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

या मेळाव्यास योगेंद्र रामचंद्र जाधव, फादर शिमाँग व्ही. सॅम्युअल आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. काही उपस्थितांनी आपल्या मनोगतासह प्रोत्साहनपूर्वक मार्गदर्शन केले. या मेळाव्यात नर्सरी ते पदवीधर विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांना प्रोत्साहनात्मक पारितोषिके देण्यात आली. उपस्थित सभासदांच्या कुटुंबाची ओळख करुन त्यांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या मेळाव्यास महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय रामचंद्र जाधव व बाजल धोंडू जाधव यांनी केले, तसेच आभार प्रदर्शन मंडळाचे सरचिटणीस भिमानंद महादेव जाधव यांनी केले.

कार्यक्रमासाठी रोहन जाधव, अजित जाधव, प्रमोद जाधव, दिपक महादेव जाधव, संतोष रत्नु जाधव यांनी मेहनत घेतली.

# कामा रुग्णालयात सुरू होणार नऊ नवे विभाग

## मुंबई, नवी मुंबई व रायगडमधील रुग्णांना दिलासा मिळणार

**मुंबई : प्रतिनिधी**

जी. टी. वैद्यकीय महाविद्यालयामध्ये कामा रुग्णालय संलग्नित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार कामा रुग्णालयामध्ये लवकरच नऊ नवीन विभाग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे कामा रुग्णालयामध्ये उपचारासाठी येणाऱ्या मुंबई, ठाणे, भिवंडी, नवी मुंबई व रायगडमधील रुग्णांना दिलासा मिळणार आहे.




जी. टी. रुग्णालयाचे १०० विद्यार्थी क्षमता असलेले वैद्यकीय महाविद्यालयात रुपांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानंकाची पूर्तता करण्यासाठी जी. टी. रुग्णालयबरोबरच कामा रुग्णालयाचा वैद्यकीय महाविद्यालयात समावेश करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

या निर्णयाबरोबरच कामा रुग्णालय अधिक अद्ययावत करण्यात येणार आहे. त्यासाठी कामा रुग्णालयामध्ये नऊ नवीन विभाग सुरू करण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण विभागाने घेतला आहे.

यानुसार कामा रुग्णालयामध्ये शरीरशास्त्र, शरीरविज्ञानशास्त्र, जीवरसायनशास्त्र, न्यायवैद्यक शास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, रोगनिदानशास्त्र, स्त्रीरोग शास्त्र आणि बालरोग शास्त्र हे नऊ नवीन विभाग सुरू करण्यात येणार आहेत. या विभागांसाठी आवश्यक असणारे विभागप्रमुख, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व अन्य कर्मचारी यांचीही नियुक्ती करण्यासंदर्भातील प्रक्रिया लवकरच करण्यात येणार आहे.

जी. टी. वैद्यकीय महाविद्यालयाला राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडून परवानगी मिळाल्यानंतर ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती कामा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. तुषार पालवे यांनी दिली.

कामा रुग्णालयामध्ये राज्यातील कानाकोपऱ्यातून रुग्ण येत असतात. योग्य व कमी खर्चात उपचार मिळत असल्याने या ठिकाणी सर्वसामान्यांची कायमच गर्दी असतात. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, भिवंडी, पालघर व रायगडमधून मोठ्या प्रमाणात रुग्ण येतात. या रुग्णांना याचा सर्वाधिक लाभ होणार आहे. त्यामुळे नागरिकांमधून शासनाच्या या निर्णयाचे स्वागत होत असून आभार मानण्यात येत आहेत.

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर शिवतारेंची भूमिका मवाळ

**पुणे : प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदारसंघाबाबत आक्रमक झालेले शिवसेना नेते माजी आमदार विजय शिवतारे यांनी नुकतीच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची भेट घेतली, मात्र त्यानंतरही बारामतीतीतल जागेबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा करण्यात आलेला नाही.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुंबईतील सागर बंगल्यावरच्या बैठकीनंतरही शिवतारे यांनी ठोस भूमिका घेतली नाही. कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन शनिवारी भूमिका स्पष्ट करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्याचप्रमाणे राजकारणात कुणीच कायमचा शत्रू आणि मित्र नसतो, असे सांगत बारामतीतून माघार घेणार असल्याचे बोलले जात आहे.



विजय शिवतारे हे मुंबई येथील बैठक आटपून पुण्यात पोहचले. त्यानंतर पुण्यातील पत्रकारांसोबत त्यांनी संवाद साधला.

गेले काही दिवस विजय शिवतारे यांनी पवार घराण्याविरोधात आक्रमक पवित्रा घेतला होता. बारामतीतून पवारांची सत्ता हद्दपार करण्याचा चंग त्यांनी बांधला होता. काहीही झाले तरी बारामतीमधून लढणारच, असा निर्धार व्यक्त करून त्यांनी मतदारसंघात भेटीगाठीही सुरू केल्या होत्या, परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या भेटीनंतर त्यांची भाषा काहीशी मवाळ झाली.

विजय शिवतारे म्हणाले, मी शनिवारी मतदारसंघातील कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांची महत्त्वाची बैठक बोलावली आहे. दरम्यान मुंबईत झालेल्या बैठकी बाबत मी त्यांना सांगणार आहे. त्यांची मते जाणून घेणार आहे. राजकारणात आम्ही स्वतः साठी नाही तर जनतेसाठी लढत असतो. राजकारणात कोणीच कुणाचा कायमचा शत्रू आणि मित्र नसतो. प्रमुख कार्यकर्त्यांशी बोलून त्यांचे मत काय आहे हे जाणून घेणार ते निगेटिव्ह असेल किंवा पॉझिटिव्ह असेल, गरज वाटली तर प्रमुख कार्यकर्त्यांना घेऊन मुख्यमंत्र्यांना पुन्हा भेटणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## दुखवटा

### लाडकुबाई मोहिते



**उरण** : तालुक्यातील दादर पाडा येथील लाडकुबाई बाळू मोहिते यांचे वृद्धत्वाने वयाच्या ९३वर्षी शनिवारी निधन झाले. त्यांच्या निधनाने मोहिते परिवारावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या अंत्यविधीसाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. लाडकुबाई बाळू मोहिते यांचा दशक्रिया विधी सोमवार (दि.१) सकाळी ८.३० वाजता भोम खाडी येथे होणार असून तेरावे गुरुवार (दि. ४) राहत्या घरी दादर पाडा येथे होणार आहे.

# गॅसचा काळा बाजार करणाऱ्यांवर कारवाई

## एकजण ताब्यात, दुसरा फरार

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील उसर्ली गावामध्ये घरगुती गॅस चोरी करणाऱ्या एकाला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून अन्य एकजण पोलिसांच्या तावडीतून निसटला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे गॅसचा काळा बाजार पुन्हा उजेडात आला आहे.

यापूर्वी कळंबोली येथे पोलीस उपायुक्तांनी धाड टाकून टँकरमधून गॅस चोरीचे प्रकरण उजेडात आणले होते. उसर्ली गावाजवळील शिवमंदिराशेजारील मोकळ्या जागेत गॅसचा काळा बाजार सुरू असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला. एका तीनआसनी रिक्षामध्ये गॅस सिलिंडरमधून गॅस काढून तो रिकाम्या काळ्या रंगाच्या बाटल्यात भरला जात असताना पोलिसांनी २१ वर्षीय मनोजकुमार बिश्नोई याला ताब्यात घेतले. मनोजचा साथीदार तेथून निसटला, मनोज हा याच परिसरातील ओमकार इमारतीमध्ये राहतो. तो मूळचा राजस्थान येथील बिकानेर जिल्ह्यातील नानेदडा गावातील रहिवासी आहे.

मनोज हा एका गॅसपुरवठा करणाऱ्या एजन्सीमध्ये कामाला आहे. पोलिसांनी रिक्षासोबत भारत गॅस कंपनीचे सहा सिलिंडर जप्त केले आहेत, तसेच पोलिसांना रिक्षात लोखंडी नळी सापडली. याच लोखंडी नळीच्या माध्यमातून मनोज व त्याचा साथीदार गॅस मोठ्या बाटल्यातून काढून लहान बाटले भरत होता.

काळ्या बाजारातून मिळालेले सिलिंडर तो परिसरात विक्री करीत असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे. या घटनेमुळे घरगुती गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यामधून मिळणारा गॅस हा अपुरा पुरवठा होत असल्याची साशंकता रहिवाशांनी व्यक्त केली आहे. पनवेलमध्ये गॅसचा काळाबाजार करणारी मोठी टोळी सक्रिय असल्याची शक्यता असून पोलीस याबाबत कसून तपास करीत आहेत.

पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे घरगुती गॅस सिलिंडरमधून गॅस चोरी करणाऱ्या टोळीचे धाबे दणाणले आहे. पोलीस निरीक्षक अंजुमन बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे व विनोद लभडे यांनी याप्रकरणी भादंवि. २८५, ३४ सह दि लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस रेग्युलेशन सप्लाय अँड डिस्ट्रिब्युशन ऑर्डर २००० ४ (१) (अ) अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

सध्या मनोज याला कायदेशीर नोटीस देऊन सोडण्यात आले असून त्याच्या साथीदाराचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# पनवेल पोलिसांची अवैध दारू अड्ड्यावर कारवाई

## गावठी हातभट्टीच्या दारूसह साहित्य केले नष्ट



**पनवेल : वार्ताहर**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलिसांनी अवैध धंद्यावर कारवाई करीत गावठी हातभट्टीची दारू व दारू निर्मितीसाठी लागणारे साहित्य नष्ट केले आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अवैध धंद्यांवर कारवाई करण्याकरीता पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सहआयुक्त संजय येनपुरे, पोलीस उपआयुक्त विवेक पानसरे, परिमंडळ २, पनवेल व सहा. पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांनी आदेश दिले होते. त्यानुसार पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, भंगारपाडा गावात प्रस्तावीत डी मार्टजवळ जंगलात एक जण गावठी दारू विक्रीसाठी गाळण्याचा व बनविण्याचा उद्योग करीत असतो.

यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षे (गुन्हे) बागवान, उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार अविनाश गंथडे, सुर्यकांत कुडावकर, महेंद्र वायकर, विनोद देशमुख, शिपाई किरण कराड आदींच्या पथकाने या ठिकाणी छापा टाकला असता २५० लिटरचे १२ प्लास्टिकचे पूर्ण भरलेले बॅरलमध्ये एकूण ६०,००० रुपये किमतीचे ३००० लिटर कच्च्या दारुचे नवसागर द्रव्य तसेच दारु बनविण्यासाठी लागणारे साहित्य असा मिळून २५० लिटरचे १२ बॅरलमधील ३००० लिटर गावठी हातभट्टीची दारु व दारु निर्मितीसाठी लागणारे साहित्य नष्ट करून धडक कारवाई केली.

# वाढत्या प्रवासी संख्येमुळे उरणमधून लोकलच्या फेऱ्या वाढवण्याची मागणी

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



उरण-नेरूळ मार्गावर प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, मात्र रेल्वेच्या फेऱ्यांमध्ये वाढ होत नसल्याने गैरसोय होऊ लागली आहे. त्यामुळे या मार्गावरील फेऱ्यांमध्ये आणखी वाढ करण्यात यावी आणि रात्री १२ वाजेपर्यंत शेवटची ट्रेन सोडण्याची मागणी प्रवासी वर्गाकडून केली जात आहे.

उरण-नेरूळ-बेलापूर मार्गावरून १२ जानेवारी रोजी प्रवासी वाहतूक सुरू झाली आहे. उरण स्थानकातून दोन महिन्यांत एक लाख ५० हजार प्रवाशांनी प्रवास केला आहे. उरण रेल्वे मार्गावरून दररोज तीन हजारांहून अधिक प्रवासी प्रवास करीत आहेत, मात्र या रेल्वे मार्गावरून पाऊण व एक तासांनी एक ट्रेन सुटते. त्यामुळे सकाळपासून रात्री ९ वाजेपर्यंत फक्त रेल्वेच्या २० फेऱ्याच होतात. दिवसेंदिवस या रेल्वे मार्गावर प्रवासी संख्या वाढत आहे. वाढत्या प्रवाशांमुळे आता रेल्वेच्या फेऱ्यांमध्ये आणखी वाढ करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, तसेच नव्याने सुरू झालेल्या उपनगरीय रेल्वे मार्गावर उरण स्थानकातून रात्रीची ९.५५ तर रात्री ९.३२ वाजता बेलापूरहून शेवटची ट्रेन आहे. त्यानंतर उरण-नेरूळ -बेलापूर स्थानकावरुन रात्रीची लोकलच नसल्याने प्रवाशांचीच गैरसोय होऊ लागली आहे. त्यामुळे उरण आणि बेलापूर या दोन्ही स्थानकातून रात्री १२ वाजेपर्यंत ट्रेनची व्यवस्था करण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

### प्रस्तावाची प्रतीक्षा

*उरण-बेलापूर-नेरूळ रेल्वे मार्गावर लोकलच्या फेऱ्यांमध्ये वाढ करणे आणि या स्थानकांवरून रात्री १२ वाजेपर्यंत शेवटची लोकल सुरु करण्याबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय होईल. अद्याप तरी असा कोणताही प्रस्ताव नाही, अशी माहिती मध्य रेल्वे प्रशासन विभागाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिली.*

# भाजप आवरे गण अध्यक्षपदी अजित पाटील यांची नियुक्ती



**उरण : वार्ताहर**

आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यातील सारडे गावातील अजित धर्माजी पाटील यांची भाजपच्या आवरे पंचायत गण अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे पत्र भाजप उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर यांनी आमदार महेश बालदी यांच्या संपर्क कार्यालयात दिले व अजित पाटील यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, सारडे ग्रामपंचायत सरपंच रोशन पाटील, हर्षित म्हात्रे आदी उपस्थित होते.





**उलवे नोड :** दिनेशकुमार सैन आणि कमलेशकुमार सैन यांनी उलवे सेक्टर १७मध्ये पुजारा टेलिकॉम कार्यालय नव्याने सुरू केले आहे. त्यांच्या या नवीन कार्यालयाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी उद्घाटन झाले. त्यांनी दिनेशकुमार सैन आणि कमलेशकुमार सैन यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, माजी सदस्य योगिता भगत, सुधीर ठाकूर, किशोर पाटील, सुहास भगत, चंद्र मोहन, दीपक पोपट, दीपक मुळीक, सचिन जाधव, शंकर हजारे, नितेश पटेल, निलेश पटेल, राजूराम चौधरी, अरविंद वाविया, नरसीराम चौधरी, भागराज सोळंकी, मोहनलाल, विक्रमसिंह आदी उपस्थित होते.

# पनवेलमधून रॉयल इन्फिल्ड बुलेटची चोरी

**पनवेल :** शहरातील नवनाथ मंदिराजवळील साई छाया बिल्डिंगच्या आवारात उभी करून ठेवलेली रॉयल इन्फिल्ड कंपनीच्या बुलेटची अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना घडली आहे.

केतन राठोड यांनी त्यांची ६५ हजार रुपये किमतीची राखाडी रंगाची रॉयल इन्फिल्ड कंपनीच्या बुलेट (एमएच ०५ इके ८२४६)ही साई छाया बिल्डिंगच्या पार्किंगमध्ये उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेल मनपाच्या तिजोरीत एका दिवसात सात कोटींचा भरणा

**पनवेल :** महापालिकेच्या मालमत्ता कर भरण्याचे शेवटचे दोन दिवस शिल्लक राहिले असून, मालमत्ताधारकांनी आपला कर लवकरात लवकर भरावा असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. आजवरच्या मालमत्ता कराच्या दररोजच्या संकलनामधील उच्चांकांमध्ये शुक्रवारी (दि.२९) भरघोस वाढ दिसून आली. एका दिवसात सात कोटींचा भरणा महानगरपालिकेच्या तिजोरीत शुक्रवारी झाला आहे.

नुकत्याच झालेल्या सुनावणीनुसार, उच्च न्यायालयाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर आकारणीस पालिकेस कोणतीही स्थगिती दिलेली नाही.त्यामुळे महापालिकेच्या मालमत्ता करांमध्ये भरघोस वाढ होताना दिसत आहे. मालमत्ता कर भरण्याची ३१ मार्च शेवटची तारीख असल्याने सुट्टीच्या दिवसांमध्ये शनिवार व रविवार महापालिकेचे कार्यालय सुरू राहणार आहे.



**पनवेल :** खानाव ग्रामपंचायतीच्या प्रभारी सरपंचपदी भाजपचे बाळाराम कोंडू पाटील यांची निवड झाल्याबद्दल भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांचे अभिनंदन केले. या वेळी शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे तसेच निलेश वारदे, अशोक साळुंखे आदी उपस्थित होते.

# पनवेल मनपातर्फे चित्ररथ, निबंध, वक्तृत्व स्पर्धा

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंतीनिमित्त शालेय स्तरावर ३ ते ६ एप्रिल या कालावधीत चित्ररथ, वक्तृत्त्व व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा तीन गटात घेण्यात येणार असून महापालिका कार्यक्षेत्रातील शाळांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या स्पर्धेतील प्रत्येक गटातील प्रथम तीन क्रमांकांच्या विद्यार्थ्यांची नावे ८ एप्रिल रोजी सकाळी १२ वा. पर्यंत शिक्षण विभाग मनपा कार्यालयास सादर करावीत. सहभागी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या मुख्य स्पर्धा १० एप्रिल रोजी लोकनेते दि. बा. पाटील पनवेल महापालिका शाळा क्र. १ पनवेल येथे सकाळी १०.३० वाजता घेतल्या जाणार आहेत.

स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका लोकनेते दि. बा. पाटील मनपा शाळा क्रमांक १मधील सहशिक्षिका वैशाली चेतन पाटील यांचेकडे ८ एप्रिल रोजी सकाळी १२ वा. पर्यंत द्यावीत. या मुख्य स्पर्धेचा निकाल १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे मिरवणूक पूर्ण झाल्यानंतर घोषित करण्यात येईल. स्पर्धेतील प्रथम येणाऱ्या तीन क्रमांकांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेसंबंधी अधिक माहितीसाठी सुजित म्हात्रे (९२२०९८२३१०) आणि वैभव पाटील (९९६७९१२०६८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित चित्ररथ व लेझीम स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. याकरिता १० एप्रिल पर्यंत प्रवेशिका लोकनेते दि. बा. पाटील पनवेल महापालिका शाळा क्र. १ येथे जमा कराव्यात.

### स्पर्धेसाठी नियम व अटी

*१) स्पर्धा १० एप्रिल रोजी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत असा असेल. २) निबंध यापूर्वी कुठेही प्रसिद्ध झालेला नसावा. ३) एका व्यक्तीस गटानुसार एकाच विषयावर एकच निबंध लिहिण्याची अनुमती असेल. ४)सदरील निबंधात वैध संदर्भ असणे अनिवार्य राहील, वक्तृत्व स्पर्धा सकाळी १०.३० वाजता सुरू होईल. ५)एका व्यक्तीस गटानुसार एकाच विषयावर वक्तृत्व करण्याची अनुमती असेल. ६) चित्ररथाची उंची जमिनीपासून १२ फूट राहील यांची दक्षता घेणे. ७) आचारसंहितेचा भंग होणार नाही यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शाळेची राहील. ८)निबंध अथवा वक्तृत्व स्पर्धेचा निकाल १४ एप्रिल रोजी जाहीर केला जाईल, निबंध अथवा वक्तृत्त्व स्पर्धेच्या निकालाबाबतचे पूर्ण अधिकार आयोजकांकडे राखीव राहतील.*

### निबंध, वक्तृत्व स्पर्धेचे विषय व वेळ

*५ वी ते ७ वी निबंध स्पर्धा २०० शब्द, वक्तृत्त्व स्पर्धा ३ मिनिटे विषय- १) संविधानाचे भाग्यविधाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, २) माझी माय रमाई, ३) भिमाचे बालपण; ८ वी ते १२ वी निबंध स्पर्धा ४०० शब्द, वक्तृत्त्व स्पर्धा ५ मिनिटे विषय-१) स्त्री मुक्तीसाठी डॉ. बाबासाहेब योगदान २) मला भावलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर ३) महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर; खुला गट निबंध स्पर्धा ५०० शब्द वक्तृत्त्व स्पर्धा ७ मिनिटे विषय- १) नवीन उद्योजकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रेरणास्थान २) बुद्ध आणि त्यांचा धम्म-सर्व समस्यांचे निराकरण ३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधानातील योगदान*

# उरणच्या रानसई धरणाची पाणीपातळी खालावली

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या रानसई धरणाची पातळी मागील वर्षापेक्षा जवळपास एक फुटाने घटली आहे. त्यामुळे चिंता वाढली आहे, तर दुसरीकडे सिडकोकडून होणाऱ्या पाणीपुरवठ्यात ही घट झाली आहे. त्यामुळे मंगळवार, शुक्रवारसह आणखी एक दिवस पाणी कपात होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



औद्योगिकीकरण आणि नागरीकरणामुळे झपाट्याने लोकसंख्या वाढत असून उरणकरांच्या पाण्याची तहान भागविणारे जलस्रोत अपुरे पडू लागले आहेत. त्यामुळे रानसई धरणातून पाणीपुरवठा करतांना सिडकोच्या हेटवणे धरणातून दररोज उसने पाणी घ्यावे लागत आहे. पावसाळ्यानंतर सध्या सिडकोकडून दररोज चार एमएलडी पाणी घेण्यात येत आहे, मात्र तरीही पुढील वर्षाच्या प्रारंभी पुन्हा एकदा पाणी कमी पडत आहे.

रानसई व पुनाडे धरणातील पाणीसाठ्याची पातळी एप्रिल महिन्यात घटत असल्याने एप्रिल ते जुलै चार महिन्यांची कमतरता भासत आहे. त्यामुळेच नवीन जलस्रोत तयार करणे ही काळाची गरज आहे.

### मे अखेरपर्यंत साठा उपलब्ध

**रानसई धरणात मे अखेरपर्यंत पुरेल इतका साठा आहे. त्याच्या जोडीला सिडकोच्या हेटवणे धरणातून चार एमएलडी पाणी मिळत आहे. सध्या आठवड्यातील दोन दिवसांची पाणीकपात सुरू आहे. यात वाढ करण्याची आवश्यकता नसल्याची माहिती उरणच्या एमआयडीसीचे अभियंता विठ्ठल पाचपुंड यांनी दिले आहेत.**

## संपादकीय

# अनाठायी नकारात्मकता

आजवर प्रगत गणल्या गेलेल्या जपान व इंग्लंड यांसारख्या देशांना मोठ्या आर्थिक संकटांचा सामना करावा लागत असताना भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर जगभराच्या भुवया उंचावतो आहे. असे असताना रिझर्व्ह बँकेचे माजी गर्व्हनर रघुराम राजन यांना २०४७पर्यंत भारत हा विकसित देश म्हणून पुढे येणे शक्य नाही असे नकारात्मक भाकित करावेसे का वाटले असावे?

**आजच्या घडीला जगातील वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा उल्लेख आवर्जून होतो. भारताच्या प्रगतीच्या या उंचावणाऱ्या आलेखाचे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी तसेच जागतिक बँकेनेदेखील यापूर्वीच वेळोवेळी कौतुक केले आहे. २०१४पूर्वीची देशाच्या अर्थव्यवस्थेची परिस्थिती आणि आताची स्थिती यात मोठे अंतर आहे आणि तेही कोविड कालखंडासारख्या जागतिक महामारीच्या संकटाचा सामना करून. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाच्या सरकारने देशाचा कारभार हातात घेतला तेव्हा म्हणजे २०१४ साली भारताची अर्थव्यवस्था जगभरात ११व्या क्रमांकावर होती. नरेंद्र मोदी सरकारने तिला आज पाचव्या क्रमांकाची सर्वांत मोठी अर्थव्यवस्था म्हणून उभे केले आहे. विकासाच्या वाढीचा वेग असाच कायम राहिला तर येत्या अवघ्या तीन वर्षांत म्हणजे २०२७पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था जगातली तिसऱ्या क्रमांकाची सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनलेली असेल. त्यामुळेच स्वातंत्र्य दिनी राष्ट्राला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७पर्यंत भारत हा एक विकसित राष्ट्र बनलेला असेल व ते ध्येय नजरेसमोर ठेवून पुढील वाटचाल करण्याचा संकल्प सोडला. रघुराम राजन यांना मात्र हे ध्येय मुर्खपणाचे वाटते. जर देशातल्या मुलांना माध्यमिक शिक्षण मिळत नसेल, अनेक विद्यार्थी शिक्षण घेण्यापासून वंचित राहात असतील तर हे ध्येय गाठता येणार नाही अशी कारणमीमांसा त्यांनी त्या संदर्भात केली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ म्हणून काम पाहिलेल्या रघुराम राजन यांच्याविषयी भारतात कौतुकमिश्रित आदर आहे. तसा तो असायलाही काही हरकत असण्याचे कारण नाही, परंतु दरखेपेला ते जी विधाने करतात, ती निव्वळ अर्थशास्त्रीय अभ्यासातूनच येत असतात असे मात्र खात्रीने म्हणता येईल का याविषयी शंका वाटते. देशात सार्वत्रिक निवडणुकीच्या तोंडावर रघुराम राजन यांनी केलेली ही विधाने ही राजकीय स्वरूपाची आहेत अशी शंका कुणालाही येऊ शकते. वास्तवत: मोदी सरकारने आपल्या दहा वर्षांच्या कारकीर्दीत उच्च शिक्षणासाठी ठोस उपाययोजना राबविल्या आहेत. कौशल्य विकास कार्यक्रमावर तर सरकारने मोठा भर दिला आहे. असे असताना रघुराम राजन हे नकारात्मकतेच्या दृष्टिकोनातून देशाच्या आर्थिक वाटचालीकडे पाहात असावेत अशी शंका येते. देशाच्या विकासाचे जे चित्र आज जगासमोर आहे ते काही निव्वळ सरकारने चितारलेले नाही, तर त्याला जगभरातील नामांकित वित्तीय संस्थांनी दुजोरा दिलेला आहे ही बाब तरी रघुराम राजन यांनी टीका करण्यापूर्वी ध्यानात घ्यायला हवी होती. २०४७ सालापर्यंत म्हणजे देश आपल्या स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करीत असताना भारताला विकसित राष्ट्र म्हणून ओळख मिळवून देण्याचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोडला आहे. हे शिवधनुष्य आहे याची पुरेपूर जाणीव त्यांना आहे. म्हणूनच त्या ध्येयापासून लक्ष तीळमात्रही विचलित न होऊ देता उपाययोजना राबविण्याचा त्यांच्या सरकारचा अखंड प्रयास सुरू आहे व त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांवर देशाच्या जनतेचाही ठाम विश्वास आहे.**

# उन्हाचा तडाखा कमी करण्यास रंगपंचमी उपयुक्त



रंगपंचमी हा सण फाल्गुन वद्य पंचमीला प्रामुख्याने महाराष्ट्रात साजरा केला जातो. या दिवशी एकमेकांच्या अंगावर रंग उडवून लोक आनंदाने, उत्साहाने हा सण साजरा करीत असल्यामुळे या पंचमीला रंगपंचमी असे नाव पडले आहे. मुले-मुली पुरुष एकमेकांना रंगवण्यासाठी ढपडे घेऊन वाजवत वाजवत गटागटाने एकमेकांच्या घरी जातात व त्यांचा हर्ष उत्साहात साजरा करतात. रंगपंचमी हा सण बरेच काही सांगून जातो.

कडक उन्हाळ्यापासून अंगाची दाह शांत व्हावी म्हणून रंग उधळले जातात. या वेळी विविध रंगांची चूर्ण पाण्यात मिसळून ते पाणी पिचकाऱ्यामधून एकमेकांच्या अंगावर उडवले जाते. रंग उडविण्याचा उत्साह महाराष्ट्रात फाल्गुन पंचमीला साजरा केला जातो असे असले तरी उत्तर भारत वगैरे ठिकाणी मात्र तो होळीच्या म्हणजेच फाल्गुन पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. या उत्सवाच्या निर्मितीमागे धार्मिक व सांस्कृतिक कारण काहीसे अस्पष्ट आहेत, परंतु वसंत ऋतु मदन नववर्ष जीर्ण झालेल्या सृष्टीच्या शक्तीचे नूतनीकरण करण्याचा यातून अर्थ निघू शकतो किंवा या उत्सवाशी निगडीत अर्थ असावा असे मानले जाते. धर्मसिंधु या ग्रंथामध्ये फाल्गुन वैद्य प्रतिपदेला वसंत आरंभाचा उत्सव सुरू होतो. द्वितीयेला शेंदूर, गुलाल, चंदन, बुक्का वगैरे उधळून आनंद सोहळा साजरा केला जातो. हा उत्सव सध्या प्राकृतिक लोक वैद्य पंचमीपर्यंत साजरा करतात. अशी माहिती या ग्रंथाने दिली आहे. यावरून रंगपंचमी हा वसंतोत्सवाचा एक भाग आहे असेही दिसते.

रंगपंचमी हा वसंत ऋतूशी संबंधित महत्त्वाचा सण आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीला हा सण साजरा केला जातो. उन्हाचा तडाखा कमी व्हावा आणि थंडावा मिळावा यासाठी एकमेकांच्या अंगावर पाणी उडवून देण्याची रीत आहे. देशाच्या काही भागात रंगपंचमीला धार्मिक दृष्ट्या महत्त्व आहे. वसंत पंचमीच्या दिवशी बलराम मंदिरात या उत्सवाचे सुरुवात होते.

या दिवशी होळीशी संबंधित लोक गीते गायली जातात. व्रज प्रांतात कृष्णा आणि बळीराम होळीच्या सणाचा आनंद घेत असतात असे मानले जाते. उत्तर प्रदेशात होळीचा आनंद घेण्याला धार्मिक महत्त्व खूप आहे. ज्याप्रमाणे रंगांचे महत्त्व आपल्याला जाणून येते, त्यामध्ये एक संदेश लपलेला आहे, की सर्व जाती धर्मातील लोकांनी एकत्र राहावे. एकमेकांमध्ये भेदभाव करू नये.

रंगपंचमी खेळताना रासायनिक रंगाचे दुष्परिणामदेखील दिसून येतात. म्हणून रंगपंचमी खेळताना नैसर्गिक रंग वापरून हा दिवस साजरा करण्याचे प्रमाण आपल्याला वाढलेले दिसून येते. या दिवशी लोक भरपूर रंग खेळून आनंदवन होतात. फुलांच्या पाकळ्या, मेंदी, गुलमोहराची पाणी, टोमॅटो, हळद, डाळीचे पीठ, हळद पदार्थ पासून रंग तयार करण्याची प्रथा आपल्याला दिसून येते.

द्वारपाल युगात गोकुळात बालकुमार, कृष्ण आपल्या गोपाळ सवंगड्यावर पिचकारीने रंगीत पाणी उडवित असे. उन्हाची तलखी कमी करत असेल तीच प्रथा आजही रंगपंचमीच्या स्वरूपाने चालू आहे. मध्ययुगात स्थानिक होळी आणि रंगपंचमी सण साजरा करीत होते. होळी, रंगपंचमी व धुलिवंदन या तिघांची मिळून होळी म्हटले जाते, ही आणखीन एक गंमतच आहे. वास्तविक फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला होळी असते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी धुलीवंदन असते. फाल्गुन वैद्य पंचमीला तर रंग उडवण्याचा कार्यक्रम असतो. म्हणून ती रंगपंचमी असते, पण याला होळीच म्हटले जाते. होळी मुळात चालू कशी झाली याची पुराणात कथा आहे.

होळी साजरी करण्याची प्रथा थोडी बदललेली दिसते. होळी साजरी करायची प्रथा नंतर गावागावात वाढली आणि त्यावरून जीवघेणी भांडणे होऊ लागली. दुसऱ्या गावातील लाकडी चोरून आणायची आणि त्यासाठी भांडाभांड करायची. यामुळे होळी कलंकित झाली. होळीसाठी वर्गणी काढायची आणि ते पैसे मादक द्रव्य उडवायचे, होळीसमोर बोंबा मारायच्या. अचकट-विचकट चाळे करायचे अशा पद्धतीने हा सण साजरा होऊ लागला. यामुळे सुसंस्कृत लोकांना अशा सणांचे अप्रूप वाटेनासे झाले आहे.

रंगपंचमीविषयी काही पौराणिक कथा आपल्याला दिसून येतात. पुराण कथेनुसार शंकराने फाल्गुन पौर्णिमेला मदनाला जाणले होते. त्यानंतर त्यांनी रंगरुपाने त्याला पुन्हा जिवंत केल्याचा आनंद व्यक्त करणे हादेखील या उत्सवा मागचा हेतू असण्याची शक्यता आहे. पूर्ण निवांत मान पुण्याच्या पद्धतीमध्ये होळी पौर्णिमा ही वर्षाची अखेरची तिथी ठरल्यामुळे होळीनंतर नव्या वर्षाचा प्रारंभ होतो व त्यानुसार रंगपंचमी हा नववर्षाच्या स्वागताचा उत्सव असण्याची शक्यता आहे.

जीर्ण झालेली सृष्टी होळीमध्ये जळून नष्ट झाली असून आता नव्या सृष्टीचा उदय झाला आहे असे हे या आनंद उत्सवातून सूचित केले जाते. लग्नानंतराच्या पहिल्या वर्षी सासुरवाडीकडून जावयाचे बारा सण साजरे होतात. त्यामध्ये रंगपंचमीचा अंतर्भाव आहे. त्या दिवशी नववधूला केशरी रंग उडविलेली नवी साडी सासरकडून मिळते.

मराठ्यांच्या कारकिर्दीत सरदार, प्रतिष्ठित लोक रंगपंचमी मोठ्या उत्साहाने साजरी करीत असत असे शाहीर वर्णनावरून दिसते. रंगपंचमीनिमित्त भरलेल्या दरबारात छोट्या जिजाईने पाच वर्षे वयाच्या शहाजी भोसले यांच्या अंगावर रंग पडल्यामुळे त्यांचे पती पत्नीचे नाते सुचित होऊन पुढे त्यांचा विवाह झाला. अशी आख्यायिका शाहिरांनी केली आहेत. काही ठिकाणी रंगपंचमीच्या दिवशी लाभ घेण्याची पद्धत आहे.

रंगपंचमीविषयी आणखी एक कथा प्रचलित आहे ती म्हणजे भगवान श्रीकृष्णाने मथुरा वृंदावन येथे गोपिकांचा रंगपंचमी खेळण्याचे प्रमाण आहे. त्यावरचे काव्य आणि चित्रे चांगलीच लोकप्रिय आहेत, पण आज रंगपंचमी तशी भावना राहिलेली नाही. रंगपंचमीच्या १५ दिवस आधीपासून पाण्याने भरलेले फुगे मुली आणि महिला यांच्यावर फेकले जातात. गाडीतून प्रवास करणाऱ्या कितीतरी प्रवाशांना याचा अनुभव आला आहे. यातून काही जन्माचे वैगुण्य आले आहे. त्या विरोधात दंड बनवली गेली, पण ते पुरेसे नाही. आजही सर्रास त्यांना फुगे मारण्याचा त्रास होताना दिसतो. ही एक प्रकारची विकृती म्हणावे लागेल. अगदी शाळेतच या गोष्टीला प्रारंभ करतांना दिसतो. महाविद्यालयीन मुले-मुली आणि झोपडपट्टीतले मुलं यामुळे रंगपंचमीचा रंग बिघडलेला आहे तसेच होळी सुरू होण्यामागे पुराणात एक कथा आहे.

हिरण्यकश्यपू या दैत्याला आपला मुलगा प्रल्हाद याचे नारायण वेड सहन झाले नाही आणि त्यांनी त्याला मारायचे ठरवले. त्यासाठी त्यांनी आपल्या बहिणीला पाचारण केले. तिचे नाव होलिका होते. ती क्रूर होती. प्रल्हादाला मारण्यासाठी होलिकेने एक अग्निकुंड प्रज्वलित केले आणि ती त्यात प्रल्हादाला ढकलायला लागली, पण त्या प्रयत्नात तिच जळाली. त्या वेळी प्रल्हादाच्या पाठीराख्यांनी हर्ष व्यक्त केला.

**(साभार : मराठीमोल)**



## बदलते तंत्रज्ञान

# इन्स्टाग्राम रीलसमध्ये असा द्या व्हॉईस ओव्हर

जर तुम्ही इन्स्ट्राग्रामवर नव्यानेच रील, व्हिडिओ बनवण्यास सुरुवात केली असेल तर याठिकाणी रील व्हिडिओमध्ये, तुम्ही म्युजिक आणिसाउंड इफेक्टसह तुमचा व्हॉइस ओव्हर कसा देऊ शकता याबद्दलची माहिती आहे. रील व्हिडिओमध्ये, तुम्ही म्युझिक आणि साउंड इफेक्टसह तुमचा व्हॉइस ओव्हर देऊ शकता. विशेष बाब म्हणजे रील व्हिडिओवर व्हॉईस ओव्हर देण्यासाठी तुम्हाला कोणत्याही थर्ड पार्टी पचा सहारा घ्यावा लागणार नाही. खपीींरसीरा ठशशश्री व्हिडिओंमध्ये व्हॉईस ओव्हर रेकॉर्ड करण्यासाठी ॲपमधील सपोर्ट प्रदान केला जातो. यासाठी तुम्हाला काही सोप्या स्टेप्स फॉलो करायच्या आहेत.





सर्वप्रथम तुमच्या स्मार्टफोनमध्ये Instagram App उघडा. यानंतर खालच्या पट्टीवर दिसणाऱ्या + आयकॉनवर क्लिक करा. + आयकॉनवर क्लिक केल्यानंतर तुमच्यासमोर चार पर्याय दिसतील, ज्यामध्ये पोस्ट, स्टोरी, रील आणि लाईव्हचे पर्याय असतील. आता तुम्हाला Reels पर्यायावर क्लिक करावे लागेल. आता कॅमेरा स्टार्स करा आणि तुमची रील तयार करा. रील रेकॉर्ड केल्यानंतर, तुम्हाला तुमच्या रीलच्या कोपऱ्यात म्युझिक आयकॉन दिसेल. या चिन्हावर क्लिक करा. म्युझिक आयकॉनवर क्लिक केल्यानंतर तुम्हाला खाली काही पर्याय दिसतील, ज्यामध्ये म्युझिक, व्हॉईस ओव्हर आणि साउंड इफेक्ट इ. पर्याय असतील. तुम्हाला या तीनपैकी व्हॉईस ओव्हर पर्यायावर क्लिक करावे लागेल.

यानंतर तुम्ही रील व्हिडिओसाठी तुमचा आवाज देऊ शकता. व्हॉईस ओव्हर दिल्यानंतर शेअर बटणावर क्लिक करून तुमची रील इंस्टाग्रामवर शेअर करा.

अलीकडे इन्स्टाग्रामवर एकाच वेळी अनेक फिचर्स जोडण्यात आले आहेत. या फीचर्सच्या आधारे आता आपण इन्स्ट्राग्रामवर गेम देखील खेळू शकता. जाणून घेऊया यासाठीच्या सोप्या स्टेप्स. इन्स्ट्राग्राम आपल्या युजर्सना DM मध्ये गेम खेळण्याची सुविधा देते. यावर तुम्ही एक 'झेपस' गेम खेळू शकता. यासाठी कुठल्याही DM चॅटमध्ये जाऊन एक इमोजी सिलेक्ट करा. आता त्या ईमोजीवर टॅब करताच एक नवीन स्क्रीन ओपन होईल. स्क्रीनवर ईमोजी एका बॉल स्वरूपात दिसेल. स्क्रीनच्या खाली एक स्लायडर असेल त्याला तुम्ही मूव्ह करून खेळू शकता. स्लायडर सतत मूव्ह करत तुम्हाला स्माईली स्क्रीनवर खाली टच होण्यापासून वाचवायचा असतो.

# प्रसिद्ध गीतकार, कवी आनंद बक्षी



## निमित्त

आनंद बक्षी हे एक हिंदी गीतकार व कवी होते. बक्षी यांचा जन्म २१ जुलै १९३० रोजी आताच्या पाकिस्तानमधील रावळपिंडी येथे काश्मीरी मोहयाल ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांची आई सुमित्रा आनंद बक्षी ते पाच वर्षांचे असताना वारली. त्यांचे कुटुंब भारताच्या फाळणी दरम्यान २ ऑक्टोबर, १९४७ रोजी भारतात आले. डकोटा विमानातून दिल्लीला आल्यावर बक्षी कुटुंब पुणे, मेरठ आणि शेवटी परत दिल्लीत येऊन स्थायिक झाले.

कविता हा त्यांचा जीव की प्राण. त्यांचे विश्वच निराळे. शब्दांच्या मळ्यात फिरणारे. त्यात त्यांच्या वाट्याला आली लष्करातली नोकरी. लष्कराच्या कडक शिस्तीत शब्दांना अधिकच साचेबद्धता आली. ते रुक्ष वातावरण, तो युद्धाचा सराव, लष्करी कवायत अशा वातावरणात हा शब्दप्रभू कवितेच्या मळ्यात खुशाल बागडायचा. अंगच्या प्रतिभेने रुपेरी पडद्याच्या दालनात त्यांनी प्रवेश केला. त्यांनी रसिकांना जिंकले. कारण त्यांच्या शब्दांची जादूच तशी होती. त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या गीतांनी तरुणाईला झिंग आणली. गायक व्हायचे आनंद बक्षींच्या मनात खूप होते. मात्र, त्यांच्यातील कविमनाने गायकीवर मात केली. ते गीतकार बनले आणि जन्माला आली तुमचे-आमचे जीवन फुलवणारी, अविस्मरणीय गाणी.

शब्दांच्या या जादुगाराने आपल्या गीतांनी रसिकांना जणू मोहिनीच घातली. प्रेमाची ओढ असो की विरह, आई-मुलातील वात्सल्य असो की मरणाची अपरिहार्यता असो, आनंद बक्षींच्या लेखणीने या सर्व भावना रसिकांच्या मनी ठसायच्या. १९५८ मध्ये आलेला 'भला आदमी' हा गीतकार आनंद बक्षींचा पहिला चित्रपट. 'धरती के लाल न कर इतना मलाल' हे त्यांचे पहिले गाणे. आनंद बक्षी प्रकाशझोतात आले ते 'जब जब फूल खिले'च्या गीतांमुळे. या चित्रपटात त्यांची लेखणी अशी खुलली की तिने रसिकांची मने काबीज केली. 'ये समा, समा है ये प्यार का' हे यातले लताच्या आवाजातले गाणे आजही ताजे, टवटवीत वाटते.

सहज ओठांवर येतील असे साधे, आशयघन शब्द, मनाला भावणाऱ्या शब्दांची यमकालंकारात केलेली सहज-सोपी गुंफण ही आनंद बक्षींच्या गाण्यांची वैशिष्ट्ये. रसिकांच्या मनातले भाव नेमकेपणाने त्यांच्या गीतांत उतरायचे. मैत्री असो की द्वेष, प्रेम असो की मत्सर, वासल्य असो की कारुण्य, जीवनाचे तत्त्वज्ञान असो की फँटसी, आनंद बक्षींची लेखणी हे सारे भावविश्व चपखलपणे टिपायची. या सर्व भावना मग सुंदर गीतातून रसिकांच्या मनात रुंजी घालायच्या. संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याबरोबर आनंद बक्षी यांचे सूर जुळले.

या त्रयीने अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. आने से उसके आये बहार (जीने की राह), बिंदिया चमकेगी (दो रास्ते), सावन का महीना (मिलन), मैं शायर तो नहीं (बॉबी), परदा है परदा (अमर अकबर अँथोनी), आदमी मुसाफिर है (अपनापन), डफलीवाले (सरगम), ओम शांती ओम (कर्ज) ही आनंद बक्षी-लक्ष्मी-प्यारे या त्रयींची काही सुपरहिट गाणी. लक्ष्मी-प्यारे यांच्याप्रमाणेच राहुलदेव बर्मन (आरडी) यांच्याबरोबरही आनंद बक्षी यांचे सूर जुळले. ना कोई उमंग है (कटी पतंग), रैना बीती जाए (अमर प्रेम), महेबूबा महेबूबा (शोले), परबत के पीछे (महेबूबा), सावन के झूले पडे (जुर्माना), दम मारो दम (हरे राम) ही आरडी-आनंद बक्षी यांची काही गाजलेली गाणी. कल्याणजी-आनंदजी, अन्नु मलिक, राजेश रोशन या संगीतकारांसाठीही आनंद बक्षी यांनी अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. अशा या महान गीतकाराचे ३० मार्च २००२ रोजी निधन झाले.

(साभार : इंटरनेट)

## क्लिक...क्लिक...!



**काठमांडू : जनकपूर हे नेपाळमधील एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. जनकपूर येथे सीतेचे बालपण गेले व तिथेच प्रभू श्रीरामाशी लग्न झाले. येथे एक मंदिर बांधले गेले आहे. त्या मंदिराचे सुजित विचारे यांनी काढलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# 'या' पदार्थांचा जेवणात वापर करून आजारांना करा हद्दपार

बदलत्या जीवनशैलीत फिटनेस चांगला राखणं हे सर्वात महत्त्वाचं काम आहे. स्थूलता, लठ्ठपणा, उच्च- रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह, प्रतिकार शक्ती कमी असल्यामुळं होणारे आजार, पचनसंस्थेचे आजार, कॅन्सर या आजारांचं प्रमाण वाढत आहे. या सर्व आजारांचा प्रतिकार करण्यासाठी, त्यांना रोखण्यासाठी आपल्या देशातील पारंपारिक तृणधान्यं आणि भरडधान्य (मिलेट) उपयोगाची आहेत, असं मत पुण्यातील या विषयाच्या अभ्यासक संगिता संजय कुमार यांनी दिलं आहे. त्यांनी याबाबत काही महत्त्वाच्या टिप्सही दिल्यात.



मिलेट हा प्राचीन धान्याचा एक प्रकार आहे. जो दोन प्रकारच्या धान्यांपासून बनविला जातो. अनेकांना मिलेट म्हंटलं की बाजरीची आठवण येते. हा मिलेटमधील सर्वात लोकप्रिय प्रकार आहे. भारत, नायजेरिया मिलेट चा संबंध बाजरीचा असल्याचा आठवतो, जो मिलेट मध्ये सर्वात लोकप्रिय आहे.मिलेट हे भारतसह आशियाई आणि आफ्रिकन देशांमध्ये याचं उत्पादन होतं.

बाजरीचे धान्य रक्तदाब कमी करू शकते आणि गॅस्ट्रिक अल्सर आणि पोटाचा कर्करोग टाळू शकते. बाजरी बद्धकोष्ठता, सूज आणि लठ्ठपणा कमी करण्यास देखील मदत करू शकते मिलेट हे एक पौष्टिक पीक आहे, डोंगराळ, किनारी, पावसावर अवलंबून आणि कोरड्या भागात त्याचे उत्पादन घेता येते. जमिनीची मर्यादित सुपीकता किंवा वनस्पतींची वाढ टिकवून ठेवण्याची मातीची क्षमता आणि जमिनीतील ओलाव्याची श्रेणी लक्षात घेऊन ही धान्ये त्यात सहज उगवतात. ज्यात भरड आणि सूक्ष्म धान्यांचा समावेश केला जातो. बाजरीसह नाचणी, बाजरी, झांगोरा, ज्वारी, कोडो, बेरी, चेना, कांगणी, कुटकी, मूग, इतर धान्यांचाही मिलेटमध्ये समावेश होतो, अशी माहिती संगिता यांनी दिली. मिलेट्सचे मुख्य प्रकार कोडो मिलेट्स (कोद्रा) हा एक महत्तावाचा औषधी पदार्थ आहे. हे अँटिऑक्सिडंट्सचे उत्कृष्ट स्त्रोत आहे. रक्तातल्या साखरेची पातळी नियंत्रित करण्याच्या क्षमतेसाठी हे ओळखले जाते. कोडो मिलेट्सला सौम्य, मातीची चव असते आणि ती उपमा आणि खिचडीसह विविध पदार्थांमध्ये वापरली जाऊ शकते. मिलेट्स म्हणजे भरड धान्यामध्ये पोषक तत्वे मुबलक प्रमाणात आढळतात. ते फायबरने समृद्ध असतात आणि त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स, फॉस्फरस, पोटॅशियम, लोह, तांबे आणि मॅग्नेशियम हे धान्य रक्तपेशी बनवण्यातही मदत करतात, अशी माहिती संगिता यांनी दिली.

# पाली नगरपंचायतीचे वीज बिल थकले

## महावितरणने पंप हाऊसचा वीजपुरवठा केला खंडित

**पाली : प्रतिनिधी**

पालीकरांना पाणीटंचाईच्या संकटाने ग्रासले आहे. एकीकडे आंबा नदीची पाणीपातळी घटली आहे, तसेच जॅकवेलमधील गाळ काढण्यासाठी मंगळवारी व बुधवारी पालीतील पाणीपुरवठा बंद करण्यात आला. त्यानंतर गुरुवारी (दि.२८) महावितरणने नगरपंचायतीचे तब्बल १० लाख ३० हजार रुपये वीज बिल थकीत असल्यामुळे मोटरपंप हाऊसचा वीजपुरवठा खंडित केला. त्यामुळे तिसऱ्या दिवशीही पालीकरांवर पाणीटंचाईचे संकट ओढावले.

पाली नगरपंचायतीने मागील महिन्यापर्यंतचे (फेब्रुवारी) वीज बिल




या महिन्यात भरले, पण या महिन्याचे (मार्च) पंप हाऊसचे तब्बल चार ते साडेचार लाखांचे वीजबिल अजूनही भरलेले नाही. याशिवाय पथदिवे व इतर वीज बिल मागील व चालू महिन्याचे भरलेले नाही मागील महिन्याचे व चालू महिन्याचे मोटर पंप व स्ट्रीटलाईट आणि इतर वीज बिल मिळून एकूण १० लाख ३० हजार रुपये थकीत आहे. वीज महावितरण बिल भरण्यासाठी अवधी देऊनदेखील वीज बिल भरण्यात आले नाही. परिणामी नाईलाजाने महावितरणने येथील वीजपुरवठा खंडित केला आहे.

मागील व या महिन्याचे मोटरपंप, स्ट्रीट लाईट व इतर मिळून एकूण १० लाख ३० हजार रुपयांचे वीज बिल थकीत आहे. नगरपंचायतीला दोन ते तीन वेळा वीज भरण्याच्या सूचना व अवधी दिल्या, मात्र त्यानंतरही त्यांनी वीज बिल भरले नाही. त्यामुळे पंप हाऊसचा वीजपुरवठा खंडित केला. लोकांची गैरसोय होऊ नये यासाठी तात्पुरत्या स्वरूपात आजच्या दिवस वीजपुरवठा सुरू करण्यात येईल, मात्र

> **जॅकवेलमधील गाळ काढण्यासाठी पाणीपुरवठा बंद करण्यात आला. आजही गाळ काढण्याचे काम सुरू होते. त्यामुळे पाणीपुरवठा बंद होता. थकीत वीज बिल आजच भरण्यात येईल.**
>
> **-विद्या येरूनकर, मुख्याधिकारी, पाली**

वीज बिल भरले नाही तर वीजपुरवठा खंडित केला जाईल व तो वीज बिल भरल्यानंतरच सुरू केला जाईल, असे महावितरणचे उपकार्यकारी अभियंता उमाकांत सपकाळे यांनी सांगितले.

# 'डाएट'च्या प्राचार्यांची वडगाव शाळेस भेट

## कामकाजाची केली पाहणी



**चौक : प्रतिनिधी**

वडगाव शाळेच्या विद्यार्थी गुणवत्ता व शिक्षकांच्या कामाची डायट संस्थेच्या प्राचार्यांनी पाहणी करून त्यांचे कौतुक केले.

राजिप वडगाव शाळेला जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट)चे प्राचार्य डॉ. सुभाष महाजन व केंद्रप्रमुख जे.पी. परदेशी यांनी शुक्रवारी (दि.२९) सदिच्छा भेट दिली. या वेळी शाळेच्या विद्यार्थिनी आर्या कोंडीलकर व कृतिका गडगे यांनी शाळेच्या परसबागेतील फुले देऊन स्वागत केले. महाजन यांनी शाळेच्या भौतिक सुविधा, मैदान, भिंतीवरील चित्रकला, शैक्षणिक लेखन, पाणी फिल्टर, महावाचन चळवळीसाठी सुरू असलेले वाचन चटई व मुस्कान किताब घर, कम्पोस्ट प्लॅन्ट, भाज्यांची लागवड, वर्गखोल्यांची रचना हवेशीर व पुरेशा प्रकाशाची असून व्हर्टिकल पद्धतीनेसुद्धा मुले अध्ययन करू शकतात. मुलांचे वाचन, डिजिटल साहित्य हाताळणी व स्वयंअध्ययन आदी बाबींची पाहणी करीत शिक्षकांच्या कामाचे व मुख्याध्यापक सुभाष राठोड यांचे कौतुक केले.

मुलांशी संवाद साधत वाचन घेतले. शाळेचे वातावरण विद्यार्थीपूरक उत्साही असल्याचे मत प्राचार्य यांनी व्यक्त केले. वर्षभर शालेय विविध नवोपक्रम राबवत शाळा मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमात तालुक्यात तिसरी आल्याचे केंद्रप्रमुख जे. पी. परदेशी यांनी सांगितले. मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सर्वांचे आभार मानले.

# खालापुरात विद्यार्थ्यांमार्फत केली जातेय मतदान जनजागृती

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात जिल्हाधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभाग, शाळा, महाविद्यालय, सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून मतदान जनजागृती सुरू आहे.

भारत निवडणुक आयोगाने लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे, त्यामुळे मावळ लोकसभा क्षेत्र आणि कर्जत-खालापूर विधानसभा क्षेत्रात मतदान जनजागृती कार्यक्रम सुरू झाला असून त्याला मतदार यांचाही मोठा सहभाग मिळत आहे. या कार्यक्रमांतर्गत भित्तीपत्रके, शाळा, महाविद्यालयांच्या



माध्यमातून प्रभातफेरी, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, स्लोगन, घोषवाक्य, विद्यार्थ्यांकडून पालकांचे फॉर्म भरून त्यावर त्यांच्या सह्या घेणे असे कार्यक्रम सुरू आहेत.

मावळ लोकसभा क्षेत्र निवडणूक निर्णय अधिकारी दिपक सिंघला, सहायक निवडणूक अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अजित नैराले यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार आयुब तांबोळी हे संपूर्ण खालापूर तालुक्यात स्वीप हा अभिनव कार्यक्रम राबवित आहेत.

# वाशिवली येथील कॉलेजजवळ गांजाची विक्री; एकाला अटक

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील वाशिवली गावाचे हद्दीत महाविद्यालयाच्या मैदानाचे बाजूला गांजा विक्री करणाऱ्या ज्ञानेश्वर बालाजी जाधव (वाशिवली, खालापूर) याला पोलिसांनी रंगेहाथ पकडले. त्याच्याकडून १४ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

रसायनी पोलीस ठाण्याचे हद्दीत वाशिवली गावात एकजण गांजा विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना बातमीदारामार्फत मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे, गुरुवारी (दि.२८)दुपारी सापळा रचत ज्ञानेश्वर जाधव याला महाविद्यालयाच्या मैदानाचे बाजूला मोहाच्या झाडाखाली गांजा विकताना रंगेहाथ पकडले. ज्ञानेश्वरची झडती घेतली असता त्याच्याकडे एक किलो ८५ ग्रॅम गांजा व रोख तीन हजार ५४० रु. सापडले. ज्ञानेश्वर जाधव याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक एस. लहांगे हे करीत आहेत.

# शिवजयंतीनिमित्त माजगाव, आंबिवली येथे विविध कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

हिंदुचे आराध्यदैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन माजगाव, आंबिवली येथे करण्यात आले. श्री छत्रपती शिवाजी महाराज यांना मानवंदना करून मशाल ज्योत उंबरखिंड येथे नेण्यात आली.

या वेळी आंबिवली येथील तरुण वर्ग, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही ज्योत घेऊन जात असताना तरुणांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पहावयास मिळत होता. डोक्यावर भगवी टोपी, मस्तकी चंद्रकोर अशा पारंपरिक वेशात शिवभक्त ही मशालज्योत घेऊन जात होते. सायंकाळी ढोल-ताशांच्या गजरात अतिषबाजीत भव्य दिव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. शिवपालखीचे पूजन करण्यात आले.

सर्व शिवभक्तांना महाप्रसादाचे आयोजन तरुण वर्गाने केले होते. रात्री महिलांसाठी होम मिनिस्टर तसेच लहान मुलांसाठी नृत्यांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास



अनेक मान्यवरांनी शिवरायांचे दर्शन घेऊन आंबिवली येथील तरुणांचे कौतुक केले. त्यांच्या समवेत शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# एकात्मतेचा संदेश देणारा विठ्ठलवाडी भालचा पालखी सोहळा

**पेण : प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या भाल विठ्ठलवाडी येथील विठ्ठल रखुमाई मंदिरातून निघालेल्या पालखी सोहोळ्यात चलचित्र व देखाव्यांनी उपस्थितांच्या डोळ्याचे पारणे फेडले. १९९९पासून बैलगाडीतून चलचित्र देखावे निघत असून सध्या या छबिन्यात मुलामुलींनी सुंदर वेशभूषा करून त्यांना सजवून ट्रॅक्टर चलचित्र देखावे काढले जातात.

या देखाव्याच्या माध्यमातून धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकत्मता,



व्यसन, अंधश्रद्धा, शिवकाल, रामायण, महाभारत हे चलचित्र माध्यमातून जनजागृती करण्यात आली. अशा प्रकारचा पालखी सोहळा उरण तालुक्यात करंजा व जसखार या ठिकाणी असतो तसेच अलिबागमधील दिवी- पारंगी येथील जाखमाता देवीची दिवसा दुपारी २ वाजता अशाप्रकारची पालखी निघते. पेणमधील भाल विठ्ठलवाडीचा हा पालखी सोहळा रायगडमध्ये प्रसिद्ध असून १९९९पासून जा. ह. म्हात्रे गुरुजी पैराणकरवाडी, भाल विठ्ठलवाडीचे केसरीनाथ म्हात्रे, कांतीलाल म्हात्रे, गजानन म्हात्रे, दिलीप म्हात्रे, जयेंद्रथ म्हात्रे, संदेश म्हात्रे व त्यांचे सहकारी मित्र मंडळ हे गेली २४ वर्षे हा चलचित्रांचा देखावा पालखीत सादर करीत आहेत.

या पालखीसोबत शंख फुकणारा, तुतारी वाजवणारा, तसेच खंडोबाचा गोंधळी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता. यंदा चलचित्रात श्रीकृष्ण अर्जुनास महाभारत युद्धात भगवद्गीता सांगतो, गड आला पण सिंह गेला ही चलत चित्र सादर केली होती.

# सुधागडातील नवघर शाळेत मतदार जनजागृती मोहीम

**पाली : प्रतिनिधी**

महसूल विभाग सुधागड पाली आणि राजिप शाळा नवघर यांच्या संयुक्त विद्यमाने नवघर येथे मतदार जनजागृती कार्यक्रम झाला.

येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी, तसेच लोकशाही मजबूत करण्यासाठी सर्वांनी मतदान करणे आवश्यक आहे. या संदर्भातील जनजागृती करण्यासाठी शाळेच्या वतीने गावात प्रभातफेरी काढून व घोषणा देण्यात आल्या, तसेच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मतदान जनजागृतीचे पत्रक देऊन पालकांना, नातेवाईकांना




मतदान करण्याचे आवाहन करण्यासाठी नायब तहसीलदार ज्ञानेश्वर आडसुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी नायब तहसीलदार ज्ञानेश्वर आडसुळे, मंडळ अधिकारी साळवे, तलाठी विमल घोळवे, ग्रामसेवक गोरड, नवघर शाळेचे मुख्याध्यापक अनिल राणे, शिक्षक प्रमोद म्हात्रे, संगीता बैकर, वृषाली गुरव, अर्चना ठाकरे, अशोक कुवर, अनुजा माने, अंकिता जाधव आणि शाळेतील सर्व विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# सेंद्रिय खतापासून चेरी टोमॅटोची यशस्वी शेती

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात प्रगत शेती करण्याचे प्रमाण वाढले असून त्यात सेंद्रिय शेती करण्यावर शेतकर्यांचा भर दिसून येत आहे. बार्डी येथे राहणारा हेमंत कोंडीलकर या तरुणाने सेंद्रिय खतांची शेती केली असून रसायनांचा कोणताही वापर न करता कीटकनाशके तयार केली आहेत. सेंद्रिय खतांच्या माध्यमातून भाजीपाला शेती विशेष चर्चेत असून त्यांच्या शेतात अन्य भाजीपाला यांच्यासह चेरी टोमॅटोची यशस्वी शेती केली आहे.

बार्डी गावातील पदवीधर तरुण हेमंत नामदेव कोंडीलकर यांनी सेंद्रिय शेतीचा पुरस्कार केला आहे. मुरूम मातीच्या जमिनीवर सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला शेती करण्याचा प्रयोग कोंडिलकर हे गेली तीन वर्षे करीत आहेत. सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला, शेतीत विविध यशस्वी प्रयोग करीत असून भाजीपाल्याच्या देशी बियाणांचा वापर करून बार्डी गावातील शेतकरी परशुराम चौधरी यांच्या शेतामध्ये सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला पिकवित आहेत. यामध्ये भरीताची वांगी, गवार, भेंडी, टेमॅटो, चेरी टोमॅटो, देशी चवळीची लागवड केली आहे. या भाजीपाला पिकांसाठी लागणाऱ्या सेंद्रिय खतांचा वापर केला आहे. याबरोबर किटकनाशके कोंबडीखत, दशपर्णी अक, ह्युमिक ॲसिड, बायोइंजाईम, फिश ऑईल, कंपोस्ट खत यांच्यापासून स्वतः तयार केली आहेत. त्यामुळे शेतिवरील उत्पादन खर्च कमी होतो आणि लोकांना विषमुक्त भाजीपाला देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहे.

कृषी विभागातील तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी, तसेच कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षकांकडून सहकार्य आणि मार्गदर्शन लाभत आहे.



# धाटाव विभागात शिवजयंती उत्साहात साजरी



**धाटाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती गुरुवारी (दि. २८) धाटाव विभागातील महादेव वाडी, तळाघर, बोरघर, लांढर, किल्ला, रोठ खुर्द या गावात उत्साहात साजरी करण्यात आली. खांद्यावर भगवा ध्वज, हातामध्ये धगधगती शिवज्योत आणि मुखातून छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी, असा जयघोष करीत अनेक शिवप्रेमींनी किल्ले रायगड येथून आपल्या गावी आले.

महादेव वाडीमध्ये (एक धाव माझ्या राजासाठी) शिवज्योत किल्ले अवचितगड येथून आणण्यात आली. सकाळी दहा वाजता शिवज्योतीचे आगमन झाले. त्यानंतर शिवराज्याभिषेक, पुजा, शिव आरती, शिववंदना करण्यात आली. दुपारी महिलांचा हळदीकुंकू कार्यक्रम तर सायंकाळी पालखी सोहळा मोठ्या उत्साहात करण्यात आला. तळाघर इथे किल्ले रायगड येथून आणलेल्या शिवज्योतीचे श्री क्षेत्र महादेव मंदिर येथे आगमन झाले. त्यानंतर गावदेवी मंदीरात परिसरात प्रदक्षिणा घालून महाआरती करण्यात आली. वस्ताद कै. मेगेश मोरे मर्दानी आखाडा ग्रुपने लाठी काठी, दांडपट्टा, तलवारबाजी प्रात्यक्षिके दाखवण्यात आली, तर रात्री ग्रामस्थ मंडळ तळाघर व युवक मंडळ यांचे रात्री संगीत भजन करण्यात आले.

आदर्श मित्र मंडळ लांढर येथे किल्ले रायगड ते लांढर शिवज्योत आणण्यात आली. या शिवज्योतीचे स्वागत मोठ्या धूम धडाका करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहणाचा कार्यक्रम करण्यात आला. शिवराज्याभिषेक व विधीवत पूजा करून दुपारी पालखी सोहळा करण्यात आला. सायंकाळी हरिपाठ, रात्री युवा कीर्तनकार हभप कवी महाराज झावरे-पारनेर यांचे शिवकीर्तन झाले, तर बोरघर गावामध्ये शिवप्रेमीने विविध कार्यक्रम झाले.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेले मौजे दिघोडे, तालुका उरण, जिल्हा रायगड मधील मिळकतीचे विद्यमान मालक १. **श्रीमती. रंजना उर्फ - निशा दशरथ जोशी व** २. **श्रीमती. सुमती शंकर ठाकुर** यांचे मालकी हक्काची, ताबेकब्जातील मिळकती असून सदरची मिळकत आमचे **अशिल महेश इन्टरप्रायझेस अण्ड इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड प्रो.प्रा. श्री. मनोज एच. पडते,** यांनी २०१८ साली १. **श्रीमती. रंजना उर्फ निशा दशरथ जोशी व** २. **श्रीमती. सुमती शंकर ठाकुर** चेक देऊन कायम खरेदी करण्याचे ठरविलेले हीते. परंतु कुटुंबात वाद असल्यामुळे त्यावेळी खरेदीखत झाला नाही, तरी सदर मिळकतीचे करारनामा करण्याचा आहे. परिशिष्टात वर्णनात नमुद केलेल्या मिळकतीचे करारनामा करणार असल्याने या कारणासाठी जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे – दिघोडे, तालुका उरण ,जिल्हा रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| ३८ | ३ | | ०—८८—३० | २.५६ |
| | | पो.ख. | ०—०७—३० | |
| | | एकूण क्षेत्र | ०—९५—६० | |
| | | पैकी | ०—१६—० | |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत अन्य कोणाचाही, कोणताही प्रकारचा हक्क, हितसंबध व अधिकार ,ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट समझोता करार, साठेकरार, विक्रीविनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी वारसाहक्क, ट्रस्ट न्यास भाडेपटटा सबलिज, अंडरलिज, वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ चौदा दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचे खालील पत्त्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात याप्रमाणे मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास , सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २९/०३/२०२४
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड. कांचन शिवाजी पाटील**
बी.ए.एल.एल.बी

**पत्ता-** ऑफीस नं २०१, दुसरा मजला, साई आर्केड, जी.पी. परसिक बँकेवरती, लाईफ लाईन हॉसपिटल जवळ. बस स्टॅन्ड समोर, जुन पनवेल, ता. पनवेल. जि. रायगड. ४१०२०६. मोबाईल नं ८१०८८८२६११ ८६८९८०९८९६

## निवडक



### विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

**रसायनी** : स्वामी विवेकानंद इंग्लिश मिडियम स्कूल, गूळसुंदे येथील मुख्याध्यापिका ममता मनोहर पाटील यांच्या पाठपुराव्याने व अजित पाटील यांच्या सहकार्याने प्रमोद झवेरी फाउंडेशन (शुभस्पर्श ग्रुप) यांच्याकडून शाळेतील मुलांना पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल उपलब्ध करण्यात आली आहे. या कामाचा शुभारंभ नुकयाच करण्यात आला. याकरिता शुभदा पॉलिमर प्रॉडक्टच्या फाल्गुनी देवांग झवेरी यांचे सहकार्य लाभले. या वेळी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सीईओ कैलास गावडे, मुखाधापक व पंच कमेटीचे अध्यक्ष आर. डी. पाटील, सदस्य सखाराम पाटील, भाई लाड, बबनराव गुडेकर, शुभदा पॉलिमरचे अधिकारी जिग्नेश दवे, आनंद उपासनी, सचिन पवार, राजेश बाविसकर, सुनील पाटील, प्रताप पंडित आदी उपस्थित होते.

### गरजू मुलांना पोषण आहाराचे वाटप



**नवी मुंबई** : वैदिक संस्कृती सेवा संगठन व जुमलियन इंडिया लिमिटेडतर्फे गरजू मुलांना पोषण आहाराचे किट वाटप करण्यात आले. इंदिरानगर वागळे इस्टेट ठाणे येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संगठनचे राष्ट्रीय अध्यक्ष सुलभ मिश्रा व युवा राष्ट्रीय अध्यक्ष बाबाजी इंदोरे तसेच कार्यकर्ते उपस्थित होते. या मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या तपासणीत मुलांनी कोणता आहार घेतला पाहिजे याचे मार्गदर्शन या मुलांच्या मातांना करण्यात आले. मार्गदर्शन करून महिनाभर मुलांना पुरेल इतक्या पोषण आहाराचे किट वाटप करण्यात आले. यासोबत महिलांना रोजगार प्रशिक्षण तसेच त्याबाबतचे मार्गदर्शन करण्यात आले.

### श्री संत गजानन गीत काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**नवी मुंबई** : शिवजयंतीनिमित्त गुरुवारी (दि.२८) नेरूळ



सेक्टर १२ येथील ज्येष्ठ नागरिक संघ येथे कवी गज आनन म्हात्रे यांनी लिहिलेल्या श्री संत गजानन गीत या काव्यसंग्रहाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अरविंद वाळवेकर यांच्या हस्ते झाले. या वेळी माजी नगरसेवक विनोद म्हात्रे, गणेश म्हात्रे उपस्थित होते. सभागृहात शंभरहून अधिक श्रोते हजर होते. अरविंद वाळवेकर यांनी कवी गज आनन म्हात्रे यांचे कौतुक केले.

### कोकण विभागीय लोकशाही दिन रद्द

**नवी मुंबई** : कोकण विभाग लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, त्याबाबतची आदर्श आचारसंहिता १६ मार्चपासून लागू झाली आहे. त्यामुळे ८ एप्रिल रोजी होणारा कोकण विभागी स्तरावरील लोकशाही दिन बैठक रद्द करण्यात आला आहे, असे उप आयुक्त, (सामान्य प्रशासन), कोकण विभाग, नवी मुंबई यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

### पनवेलमध्ये वृद्धाचा मृतदेह आढळला

**पनवेल** : परिसरात एका वृद्ध व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या व्यक्तीचे अंदाजे वय ६० ते ६५ वर्षे आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# पिस्तुल बाळगणाऱ्याला अटक

## दोन लाखांचा मुद्देमाल जप्त; आणखी सहा गुन्हे दाखल

**पनवेल : वार्ताहर**

विदेशी बनावटीचे पिस्तुल बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगाराला मानपाडा पोलीस ठाणे, डोंबिवली (पूर्व) यांनी केली अटक करून सुमारे दोन लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



मानपाडा पोलीस ठाण्यांचे हद्दीत टाटा नाका परिसर येथे एकजण बेकायरेदशीररित्या विनापरवाना पिस्तुल जवळ बाळगून फिरत असल्याबाबत माहिती मिळाल्याने गुन्हे प्रकटीकरण विभागाने पथक तयार केले. आरोपीला पकडण्याकरीता सापळा लावण्यात आला. गुप्त बातमीदार तसेच आरोपीचे वर्णनानुसार राम उर्फ शिवा फुलचंद कनोजीया (वय ४३, रा. अमर म्हात्रे चाळ, देसलेपाडा, डोंबिवली पूर्व) यास शिताफीने ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक विदेशी बनावटीचे पिस्तुल व दोन जीवंत काडतुसे असा एकूण दोन लाख ४०० रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरूद्ध मानपाडा, डोंबिवली, पनवेल शहर, टिटवाळा पोलीस स्टेशन येथे यापूर्वी सहा गुन्हे दाखल आहेत.

ही कामगिरी अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग दत्तात्रय शिंदे, उपायुक्त परिमंडळ ३ कल्याण सचिन गुंजाळ, सहाय्यक आयुक्त डोंबिवली विभाग सुनील कुराडे, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने, पोलीस निरीक्षक (गुन्हे) राम चोपडे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) दत्तात्रय गुंड, सहाय्यक पोलीस निरीक्षक संपत फडोळ, महेश राळेभात, प्रशांत आंधळे, भानुदास काटकर, हवालदार राजकुमार खिलारे, शिरीष पाटील, सुनील पवार, संजु मासाळ, विकास माळी, दिपक गडगे, पोलीस नाईक गणेश भोईर, प्रवीण किनरे, यल्लापा पाटील, देवा पवार, अनिल घुगे, शांताराम कसबे, रवि हासे, शिपाई अशोक आहेर, विजय आव्हाड, महेद्र मंझा यांच्या पथकाने केली.



## शेअर मार्केटमध्ये नफ्याचे आमिष दाखवून फसवणूक; दोघे अटकेत

**नवी मुंबई : बातमीदार**

शेअर मार्केटमध्ये खरेदी-वक्री करून अधिकचा फायदा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सोशल मीडियावर एका बनावट ॲपद्वारे तब्बल ४४ लाख ७२ हजार रुपये वेगवेगळ्या खात्यावर भरायला लावले, मात्र पैसे परत मिळत नसल्याने फिर्यादींनी सायबर पोलीस ठाणे गाठून तक्रार केली असता सायबर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारावर निलेश अरुण इंगवले, संजय रामभाऊ पाटील या दोघांना ताब्यात घेतले आहे.

शेअर्स ट्रेडिंगच्या नावाखाली जास्तीचा फायदा होत असल्याचे बनावट ॲपवर दाखवून आरोपींनी फिर्यादींचा विश्वास संपादन केला व ४४,७२,००० रु. वेगवेगळ्या अकाउंटवर ऑनलाईन भरण्यास सांगितले. त्यानंतर फिर्यादींनी गुंतवणूक केलेली रक्कम परत न करता फसवणूक केली म्हणून सायबर पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सायबर पोलीस ठाणे, नवी मुंबई यांनी सखोल तांत्रिक तपास करून आरोपींनी वापरलेले बँक खाते व मोबाईल क्रमांक पोलीस शिपाई नरहरी क्षिरसागर यांनी तांत्रिक तपास करून माहितीच्या आधारे निलेश अरुण इंगवले (वय ३०, रा. सेक्टर १६, कामोठे, नवी मुंबई, मूळ रा. सातारा) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे अधिक चौकशी केली. त्याने हा गुन्हा त्याचा साथीदार संजय रामभाऊ पाटील (वय ४८, रा. सेक्टर ६/ए, कामोठे, मूळ रा. धुळे) याच्यासोबत मिळून केला असल्याची कबुली दिली.

आरोपी संजय रामभाऊ पाटील यास ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडे विविध बँक खात्यांचे चेकबुक, डेबिट कार्ड तसेच सिमकार्ड सापडले आहेत. प्राथमिक तपासात संजय पाटील हा अन्य साथीदारांचे संपर्कात असल्याचे दिसून आले आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या चार दिवस पोलीस कोठडीत आहेत.

अटक आरोपींकडून पाच चेकबुक व सहा डेबिट कार्ड तसेच चार मोबाईल फोन, १० सिमकार्ड सापडले आहेत. आरोपी संजय पाटील हा सायबर फसवणुकीकरिता वापरणारे बँक खाते हाताळत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच आरोपींचा महाराष्ट्रासह विविध राज्यातील एकूण १० सायबर गुन्ह्यांमध्ये सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

फिर्यादी यांनी फसवणुकीची रक्कम भरलेल्या सर्व बँक खाते गोठविण्याबाबत तत्काळ पत्र व्यवहार करून सदर बँक खात्यामध्ये एकूण १८ लाख ५१ हजार ५११ रुपये गोठविण्यात सायबर पोलिसांना यश आले.

## उरणच्या शेती, मिठागरात समुद्राचे पाणी

### बांधबंदिस्तीच्या दुरूस्तीची शेतकऱ्यांची मागणी

**उरण : रामप्रहर वृत्त**

येथील शेतीचे समुद्राच्या पाण्यापासून संरक्षण करणारी बांधबंदिस्ती कमकुवत झाली आहे. त्यामुळे भरतीच्या वेळी ती फुटून समुद्राचे पाणी भातशेती व मिठागरात शिरू लागले आहे. परिणामी शेकडो एकर जमिनी नापिकी होत आहेत. त्यामुळे बांधबंदिस्तीची तातडीने दुरूस्ती करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून जोर धरीत आहे.

उरणमधील वाढते औद्योगिकरण आणि नागरीकरण यामुळे उरण तालुक्यातील मूळ शेती व मिठागरे नामशेष होण्याच्या मार्गावर असतानाच आत्ता फुटक्या खारबंदिस्तीमुळे उर्वरित शेती व मिठागरात समुद्राच्या भरतीचे पाणी शिरू लागले आहे. पूर्व भागातील उर्वरित हजारो एकर शेतजमीन खारबंधिस्ती फुटल्यामुळे नापिकी झाली असून येथे शेती करणे मुश्कील झाले आहे.


खोपटे गावाजवळील खारबंधिस्ती फुटल्याने या पट्ट्यातील हजारो एकर शेतजमिनीत पाणी शिरले असून हे पाणी सध्या खोपटे गावातील घरांपर्यंत पोहचले आहे. खोपटे ते गोवठणेदरम्यान असलेल्या मिठागरांच्या खारबंदिस्तीला खांड गेल्याने हे पाणी शेतात शिरले आहे.

मागील दोन वर्षांपासून ही खांड बुजली नसल्याने या परिसरातील शेतांमध्ये खारफुटी तयार झाली असून भातशेती करणे तर मुश्कील झाले आहे, शिवाय ही खारफुटी न्यायालयाच्या परवानगीशिवाय तोडता येत नसल्याने शेतकऱ्यांवर वेगळे संकट निर्माण झाले आहे. ही खारफुटी जर वेळीच तोडली नाही तर येथे कांदळवन तयार होण्याचा धोका आहे.

यामध्ये करंजामधील चाणजे येथील ३०० एकर, आवरे-गोवठणे येथील ३०० एकर त्याचप्रमाणे न्हावा खाडी आदी परिसरातही शेकडो एकर जमिनीत खारफुटी आली आहे. त्यामुळे उरण पनवेल तालुक्यातील खारबंदिस्तीची कामे लवकरात लवकर करून घेणे आवश्यक आहे.

### मक्याच्या कणसांची चोरी

**पनवेल** : तालुक्यातील एका फॉर्महाऊसमधून मक्याचे कणीस काढलेले १६ भारे एका टेम्पोत भरून चोरून नेल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.




येथील फॉर्महाऊसमधील शेतातील ३२ हजार रुपये किमतीचे मक्याचे कणीस काढलेले १६ भारे हे एका पांढऱ्या रंगाच्या टेम्पोमध्ये भरून फॉर्महाऊसमधील शेतातून चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## नवी मुंबईतील बाजारात विदेशी सफरचंद दाखल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

विदेशातील लाल चुटुक दिसणाऱ्या सफरचंदाची आवक नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजारात वाढली आहे. प्रति किलो २०० रुपये दराने किरकोळ बाजारात सध्या उपलब्ध आहेत.

सध्या बाजारात विविध फळ हे दाखल होत आहेत. विदेशी सफरचंद बाजारात दाखल झाला असून मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात आहे. सध्या सफरचंदाचा मौसम सुरू झाला आहे. त्यामुळे आवक होण्याला सुरुवात झाली आहे. विदेशी सफरचंद २०० रुपये किलोने विकले जात आहे. हे सफरचंद मुख्यत्वे टर्की, दक्षिण आफ्रिका, अमेरिकीया आणि न्यूझीलंड देशातून आयात केले जात आहेत. हे सफरचंद भारतीय सफरचंदाच्या तुलनेत काहीसे कमी गोड असले तरी त्यात आंबटपणा आणि कुरकुरीतपणा असल्याने ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहेत.

सध्या सातशे ते एक हजार पेटी प्रतिदिन येत असून मौसम जास्त दिवस नसल्याने आवक घटू शकते, त्या वेळी मात्र दर वाढण्याची शक्यता आहे, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली.



## महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृह मोफत उपलब्ध करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सरकारी, निम-सरकारी, खासगी, असंघटित क्षेत्रात नौकरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढले आहे. एकीकडे महिला स्वबळावर उभे राहण्यासाठी घराबाहेर पडत असताना, अशा महिलांना अनेकदा नैसर्गिक विधीसाठी स्वच्छतागृह गाठावे लागते. पालिकेने शहरातील स्वच्छतागृह महिलांना मोफत करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते निलेश कचरे यांनी आयुक्तांना पत्र लिहून केली आहे.




महिलांसाठी आवश्यक असणाऱ्या स्वच्छ, सुरक्षित, सार्वजनिक मोफत स्वच्छतागृहाचा. आज अनेक शहरांमध्ये महिलांना सार्वजनिक, गर्दीच्या व कामाच्या ठिकाणीसुद्धा स्वच्छतागृहाची व्यवस्था नाही. काही ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या पैसे द्या आणि वापर करा अशा पद्धतीने स्वच्छतागृहात जावे लागते. शासन अधिनियम अन्वये गर्दीच्या मोक्याच्या ठिकाणी, बाजार संकुले, तीर्थक्षेत्र, पर्यटनस्थळे, शाळा महाविद्यालये, शासकीय-निमशासकीय कार्यालये, राष्ट्रीय राज्य महामार्ग, पुलाखालील मोकळ्या जागा, पेट्रोलपंप, हॉटेल्स आदी ठिकाणी नागरिकांसाठी मोफत पुरेशी व स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध असावीत, परंतु बहुतांश महिलांकडून नैसर्गिक विधीचे शुल्क आकारले जाते. आपल्या नवी मुंबई शहराला उद्यान शहरासोबत, शौचालयांचे शहर अशीदेखील ओळख आहे. नवी मुंबई महानगरपालिकेला श्रीमंत पालिका म्हणून पाहिले जाते. त्यामुळे महिलांचे सार्वजनिक स्वच्छतागृहामध्ये आकारले जाणार शुल्क बंद करण्यात यावे, अशी मागणी कचरे यांनी आयुक्तांकडे केली आहे.

### शिवछाया मित्र मंडळातर्फे आरोग्य महाशिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

शिवछाया मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष बबन पाटील यांच्या ३४व्या पुण्यस्मरणाचे



औचित्य साधून शिवछाया मित्र मंडळ व न्यूईरा हॉस्पिटल, वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ३१) सकाळी १० ते २ वा. तुर्भे गावातील तलावाजवळ आरोग्य महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

यात रक्तदाब, मधुमेह, दंत चिकित्सा, नेत्र चिकित्सा तसेच इतर शारीरिक तपासण्या विनामूल्य करण्यात येणार आहेत. या आरोग्य महाशिबिराचा गरीब व गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष अंकुश वैती यांनी केले आहे.

## कडक उन्हामुळे उसाचा रस, बर्फाला मागणी वाढली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कडाक्याच्या उन्हामुळे नागरिकांच्या घशाला कोरड पडू लागली आहे. त्यामुळे तहान भागविण्यासाठी नागरिकांचे पाय उसाचा रस व बर्फखरेदीकडे वळत आहेत. उन्हाच्या वाढत्या दाहकतेमुळे शहारात रस्त्याच्याकडेला रसवंतीगृहे गर्दीने फुलली आहेत. उष्णतेने शरीरातील पाणी कमी होते. त्यामुळे थकवा जाणवतो. अशा वेळी उसाचा ताजा रस प्यायल्याने सगळा थकवा दूर होतो. त्यामुळे उसाचा रस पिण्यासाठीही नागरिक गर्दी करीत आहेत.



नागरिकांच्या आरोग्याचा विचार करता, अन्न व औषध प्रशासनाच्या मानांकनानुसार मिनरल वॉटरमधील बर्फ तयार करण्याच्या सूचना उत्पादकांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार बर्फ उत्पादकांकडून मिनरल वॉटरमधील बर्फ तयार केला जात आहे. जसजसा उन्हाचा तडाखा वाढू लागतो तशी बर्फाची मागणी वाढते. विशेषत: गारेगार, मेवाड आइस्क्रीम, सोलकढी, ताक, सरबत विक्रेते, लग्नसमारंभ, विविध कार्यक्रमांच्या जेवणावळीकरिता बर्फाची गरज लागत आहे. त्यामुळे बर्फाच्या विक्रीत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा तडाखा वाढला आहे. त्यामुळे अनेक जण गुणकारी अशा उसाचा रस पिण्याला महत्त्व देत आहेत. सध्या शहरामध्ये उसाच्या रसाची गाडीही फिरत असल्याने नागरिकांना दारातच ताजातवाना अशा उसाच्या रसाचा आस्वाद घेता येत आहे.

## वडिलांच्या स्मृतिदिनी अनाथाश्रमाला एक लाखांची देणगी




**नवी मुंबई : बातमीदार**

करावे येथील दयानंद तांडेल यांनी आपले वडील कै. भास्कर तुकाराम तांडेल यांच्या पाचव्या स्मृतिदिनी स्व. सिंधुताई सपकाळ यांच्या द मदर ग्लोबल फाऊंडेशन या अनाथ आश्रमाला एक लाख २१ हजार २१२ देणगी स्वरूपात दिली.

या वेळी विनय सिंधुताई सपकाळ, माजी नगरसेवक विनोद म्हात्रे, सिडको एम्प्लॉईज युनियनचे माजी अध्यक्ष निलेश तांडेल, समाजसेवक सुभाष म्हात्रे उपस्थित होते.

माझे वडीलदेखील सामाजिक क्षेत्रात कार्यरत होते. त्यांनी पाजलेले समजसेवेचे बाळकडू त्यांच्या पाचव्या स्मृतिदिनी प्रत्यक्षात साकारता आले. असे तांडेल यांनी या वेळी सांगितले.

## चांभार्ली थांब्यापाशी अपघाताची शक्यता

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड-आपटा रस्त्यावरील चांभार्ली थांब्याजवळ अपघात घडण्याचे प्रकार वाढले असून अधिक अपघात होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

या रस्त्याच्या थांब्याजवळ चांभार्ली गावातून येणारा रस्ता व शिवनगर येथून येणारा रस्ता एकत्र येत असल्यामुळे शिवाय दांड-रसायनी रस्ता रहदारीचा असल्याने वाहनाचा अपघात होण्याची शक्यता आहे. या ठिकाणी वाहन जाण्या-येण्यासाठी कोणत्याही प्रकारची मार्गदर्शक फलक दिसून येत नाही. शिवाय या ठिकाणी अनधिकृतपणे सहाआसनी रिक्षा व तीनचाकी रिक्षा रस्त्यातच उभ्या असलेल्या दिसत आहेत. यामुळे मोहोपाडाकडून येणाऱ्या वाहनाचा अंदाज लागत नाही. शिवाय या रस्त्यावर गतिरोधक नसल्यामुळे भरधाव वाहने धावत असतात. या ठिकाणी एखादा मोठा अपघात होऊ नये यासाठी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.



# थंड हवेसाठी प्रसिद्ध माथेरानही तापले

## उष्णतेच्या वाढत्या झळा; परिसरातील वृक्षतोडीचा परिणाम

**माथेरान : प्रतिनिधी**

थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेले पर्यटनस्थळ माथेरानमध्ये वाढत असलेली उष्णता हा आता चिंतेचा विषय ठरत आहे. वेळोवेळी तापमानामध्ये बदल होत असताना माथेरानमध्येही उष्णतेच्या झळा आता जाणवू लागल्या आहेत.



सर्वसामान्य, मध्यमवर्गीय लोकांच्या आवाक्यातील थंड हवेचे ठिकाण म्हणजे माथेरान. मुंबई व त्याला लागून असलेल्या उपनगरांमधील तसेच पुणे, नाशिकसारख्या शहरांतील पर्यटकांचे माथेरान एक प्रमुख केंद्रबिंदू आहे. येथे असलेली मिनीट्रेन, घोडेस्वारी, लाल मातीचे रस्ते व माथ्यावरील घनदाट जंगल हे पर्यटकांना नेहमीच भुरळ घालत आलेले आहे.

ब्रिटिश काळापासून माथेरानची ख्याती सर्व दूर पसरलेली आहे. प्रदूषणविरहित पर्यटनस्थळांमध्ये माथेरानचे नाव मानाने घेतले जाते. चारही बाजूने वेढलेले सिमेंटचे जंगल असताना माथेरानचा डोंगर उठून दिसत असतो. त्यामुळे माथेरानला पर्यटकांची पहिली पसंती असते, पण मागील काही काळापासून माथेरानमध्ये उष्णतेच्या झळा वाढू लागल्यामुळे माथेरानचे थंड हवेचे ठिकाण ही बिरूदावली पुसून जाते की काय, असा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे.

माथेरानला वाढत असलेली उष्णता हा आता चिंतेचा विषय होऊ लागला असून त्यावर उपाययोजना होणे काळाची गरज आहे. सिमेंट काँक्रीटचे जंगल आणि नष्ट होत असलेली वनसंपदा हे याचे प्रमुख कारण असू शकते. माथेरान डोंगराच्या पायथ्याशी व पर्वतरांगांमध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेले वृक्षतोड यामुळे येथील डोंगर उघडे पडू लागले आहेत. हे डोंगर, कातळ उष्णतेचे कारणही असू शकते. येथील जंगलामध्ये पाणी पुरवण्यासाठी असफल ठरलेले प्रयत्नही यास कारणीभूत असू शकतात. माथेरानमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असतो व हे सर्व पाणी माथेरानच्या पायथ्याशी वाहून जाते. माथेरानला सदाहरित ठेवण्याकरिता या वाहून जाणाऱ्या पाण्याला जंगलामध्ये रोखण्याकरिता बंधारे बांधणे गरजेचे आहे. हा प्रयोग फार पूर्वी करण्यात आला होता व त्याचा सकारात्मक परिणामही दिसून आला होता. त्याचप्रमाणे येथे होत असलेली जमिनीची धूप नष्ट होत असलेल्या झाडांच्या मुळांमुळे अनेक झाडेही लुप्त होत आहे. त्यामुळेच वृक्ष संवर्धन होणे गरजेचे आहे. येथील जंगलांमध्ये अनेक ठिकाणी झाडांना खाणारी वाळवी यावर वन विभागाकडून उपाययोजना व्हाव्यात, जेणेकरून येथील जंगलामध्ये व येथील वातावरणाशी एकरूप होतील अशी झाडे लावण्यात आल्यास त्याचा नक्कीच फायदा येथील वनसंवर्धनासाठी होईल.

येथील पर्यटन हेच येथील स्थानिकांसाठी अर्थाजनाचे मुख्य साधन आहे व त्याकरिता येथील निसर्ग टिकला पाहिजे व तो टिकवण्याची जबाबदारी येथील स्थानिकांनाच पार पाडावी लागणार आहे, कारण माथेरानच्या पायथ्याशी होणारी वृक्षतोड ही येथील पर्यटनासाठी घातक आहे, परंतु त्या लोकांना माथेरानशी काही देणे घेणे नसल्याने बिनधास्तपणे इंधनाकरिता झाडे तोडली जात आहेत.

माथेरानकर वृक्षारोपण करून येथील वनसंपदा वाढवण्याचा प्रयत्न करीत असताना काही विघ्नसंतोषी लोक मात्र कोणालाच घाबरत नाही. वृक्षतोड करून जाळण्यासाठी लाकडे जमा करताना रोज येथील घाटामध्ये चित्र पहावयास मिळते. यावर वनविभागाने सक्त कारवाई करण्याची गरज असून ते तसे न झाल्यास येथील वनसंपदा नष्ट होण्यास जास्त वेळ लागणार नाही व माथेरानचे नाव थंड हवेचे ठिकाण असे लवकरच पुसले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## माणगावात कॉम्प्युटर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट सेंटरचे उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

दिशा कॉम्प्युटर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट आता माणगावात बामणोली मार्गावर सुरू झाले असून या सेंटरचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती तथा माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास इंदापूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शेखर देशमुख, माजी नगरसेवक नितीन बामगुडे, सह्याद्री बझारचे संचालक गजानन मोरे, सह्याद्री पतसंस्थेचे वसुली अधिकारी दीपक शेलार, राहुल मोरे, शेखर जाधव, सुनील पवार आदी उपस्थित होते.

या वेळी संस्थेच्या संस्थापिका स्नेहल काकडे, सह संस्थापिका नेहा प्रसाद यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करून त्यांना इन्स्टिट्यूटबद्दल माहिती दिली, तर या वेळी ॲड. राजीव साबळे व जेष्ठ नेते शेखर देशमुख यांनी संस्थेला शुभेच्छा दिल्या.



## गार्डला मारहाण; गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

एचडीएफसी बँकेच्या माणगाव तालुक्यातील मोर्बा शाखा येथील गार्डला मारहाण केल्याप्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना गुरुवारी (दि. २८) रात्री ११ वाजण्याच्या सुमारास बँकेच्यासमोर घडली याबाबतची फिर्याद शुभम नागेश दाभेकर (वय २४, रा. कुमशेत, ता. माणगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

या घटनेबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील आरोपी गणेश तुकाराम पवार (वय २७, रा. शिरवली आदिवासीवाडी, ता. माणगाव) हा दारू पिऊन येऊन एचडीएफसी बँक या ठिकाणी झोपलेला आढळला. याबाबत गार्ड शुभम नागेश दाभेकर यांनी बँक मॅनेजर सतपालसिंग जावरा यांना कळविले. या गोष्टीचा मनात राग धरून आरोपीने फिर्यादी यांना शिवीगाळ, दमदाटी व हाताबुक्याने मारहाण करून तेथे बाजूला पडलेल्या दगडाने डोक्यात मारून दुखापत केली. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून या प्रकरणी अधिक तपास उपनिरीक्षक सूर्यकांत भोजकर करीत आहेत.

## मुरूडमधील शेतकऱ्याने घेतले कलिंगड, झेंडूच्या फुलांचे पीक

**मुरूड : प्रतिनिधी**

कोकणातील शेतकरी हा अल्पभूधारक असला तरी कष्टाने आपली शेती फुलवून विकास करू शकतो हे आपल्या कृतीमधून दाखवून दिले आहे मुरूड तालुक्याच्या शेणवली येथील शेतकरी रमण गोविंद महाडिक व रजनी रमण महाडिक यांनी. आपल्या एक एकर जागेत त्यांनी कलिंगड, झेंडूची फुले यासह मिरची, वांगी यांचे विक्रमी पीक घेतले आहे.



कडक उन्हात बोअरवेलच्या सहाय्याने पाणी उपलब्ध करून रमण महाडिक यांनी पत्नीसोबत मेहनत करीत आपली शेती फुलवली आहे. विशेष म्हणजे कृषी खात्याची कोणतीही मदत उपलब्ध नसताना त्यांनी स्वमेहनत घेत आपल्या शेतीमधून कलिंगडाचे मोठ्या प्रमाणात पीक घेतले आहे.

उन्हाळ्यात कलिंगडास वाढती मागणी असते. लोकांना गारेगार करण्याचे काम कलिंगड करतात. सध्या कलिंगडास घाऊक पद्धतीने विकल्यास किलोला १२ रुपये दर मिळतो. विशेष म्हणजे यासाठी शेतकऱ्यास कोठेही जावे लागत नाही संबंधित व्यापारी आपली गाडी घेऊन येतो व माल घेऊन जातो.

याचबरोबर गोंड्याच्या फुलांनासुद्धा वाढती मागणी आहे.स्थानिक पातळीवर या फुलांना ७० रुपये किलोचा भाव मिळतो, तर घाऊक व्यापारी ५० रुपये दर देत असतात.

कृषी खात्याकडून विविध योजना, बी-बियाणे याचा लाभ मिळाला तर शेती उत्पदनावरील खर्च कमी होऊन आम्हा शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी रमण महाडिक यांची अपेक्षा व मागणी आहे.

महाडिक दाम्पत्याने शेतीच्या उत्पादनातून दोन मुलींना नर्स बनवले आहे, तर एक मुलगा खासगी कंपनीत नोकरीस करतो.

**नागोठणे : येथील पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक प्रमोद कदम यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोर म्हात्रे, माजी प्रसिद्धी प्रमुख शामकांत नेरपगार, चेतन कामथे, सागर शिर्के यांनी शुभेच्छा दिल्या.**



## रोहा ब्राह्मण मंडळातर्फे आज काव्यमैफिल

**रोहा : प्रतिनिधी**

येथील ब्राह्मण मंडळातर्फे रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून शनिवारी (दि. ३०) भाटे सार्वजनिक वाचनालयाच्या भट सभागृहात गीतकार व संगीतकार मिलिंद जोशी यांच्या 'असेच होते ना तुलाही' या काव्यमैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे.

सर्व रोहेकर बंधू-भगिनींनी या काव्यमैफिलीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ब्राह्मण मंडळाचे अध्यक्ष अमित आठवले, सचिव निखिल दाते, रौप्य महोत्सव समितीचे समन्वयक किशोर सोमण, सचिन खरे आदींसह सर्व कमिटी व रौप्य महोत्सवी समितीचे सदस्य परिश्रम घेत आहेत.

## चिंचबा देवीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी

**मुरूड : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील होळीचे पटांगण या ठिकाणी चिंचबा देवीचे मोठे मंदिर असून येथे दरवर्षी होळी संपल्यावर किमान सात दिवस या देवीचे दर्शन घेण्यासाठी विविध भागातून लोक दर्शन घेण्यासाठी अलोट गर्दी करीत असतात. आताही तेच चित्र पहावयास मिळत आहे.

बोर्ली पंचतन येथे एक गाव एक होळी अशी परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. होळी दहन झाल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता देवीच्या मूळ मंदिरातून पालखी मिरवणूक निघते. त्या पालखीबरोबरच पारंपरिक पद्धतीने सुरू असलेला राधेचा खेळ व नंतर राधेची पूजा केली जाते.

देवीची पालखी गावातून फिरते त्या वेळी असंख्य महिला उपवास करतात तसेच पालखीच्या मार्गावर महिला संपूर्ण रस्त्यावर दूधाने शिंपडतात. देवीची पालखी ही संपूर्ण दिवसभर गावामधून फिरवली जाते आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ८ ते ९च्या सुमारास होळीच्या मंदिरात विराजमान होते.

सात दिवस होळीच्या नाट्यगृहामध्ये विविध प्रकारचे म्हणजेच नाटक, ग्रुप डान्स व अन्य करमणूक कार्यक्रम होत असतात. शेवटच्या रात्री येथे अखंड आगरी समाज बोर्ली पंचतन यांचे महशाचे सोंग हा कार्यक्रम होतो. या वेळी देवीची विविध रूपे साकारली जातात. सात दिवस पूर्ण झाल्यावर होळीच्या मंदिरातून पालखी मिरवणूक काढली जाते. गावातील चौकाचौकात या पालखीची पूजा-अर्चा केली जाते. बोर्लीमधील रहिवासी व पंचक्रोशीतील देवीभक्त या दिवशी बालय गो डिंगलाय या घोषवाक्याने गुलाल उधळून देवीचा जल्लोष करतात.

या होलिकोत्सवामध्ये कोणीही वादविवाद न करता देवीच्या चरणी नतमस्तक होऊन भक्तीभावाने पूजा-अर्चा करण्यात मग्न होत असतात. या सात दिवसांत मुंबई, पुणे, सांगली, रायगड, कल्याण, ठाणे येथून देवीचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने येतात.

याबाबत अधिक माहिती देताना चिंचबा देवी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुजित पाटील व खजिनदार शंकर गाणेकर यांनी सांगितले की, देवीचे हे स्थान स्वयंभू असून नवसाला पावणारी देवी म्हणून भाविकांमध्ये श्रद्धा आहे. सात दिवसांच्या या उत्सवात सर्वात जास्त महिला दर्शनासाठी येत असतात. दरवर्षी भाविकांच्या संख्येत येथे वाढ होत आहे.





## ऋतूराज वसंत

वसंतोत्सव म्हणजे निसर्गाचा उत्सव आहे. निसर्ग एरवीही सुंदर असतोच, पण वसंतात त्याचे रूप काही औरच असते. आपल्या जीवनातही तारुण्य हा वसंत ऋतूच असतो. त्याचप्रमाणे वसंत ही निसर्गाची युवावस्था आहे.

महर्षी वाल्मिकींनी रामायणात वसंत ऋतूचे अतिशय सुंदर वर्णन केले आहे. भगवान कृष्णाने गीतेत ऋतूंना कुसुमाकरः असे संबोधले आहे. कविवर्य जगदेव तर वसंताचे वर्णन करताना थकत नाहीत.

निसर्गाचे आकर्षण एरवी असतेच, पण वसंत ऋतूत त्याचे सौंदर्य जास्त खुलते. आपल्या या सौंदर्य विशेषाने तो आकर्षित करून घेतो. फक्त त्याकडे उघड्या डोळ्यांनी पाहिले पाहिजे.

नेहमीच्या धावपळीच्या जगतातून फुरसतीचे क्षण काढून निसर्गाकडे वळायला हवे. निसर्गाच्या माध्यमातून सतत चलित स्थितीत असणाऱ्या देहाला आराम दिला पाहिजे. निसर्गाकडे एक अजब जादू आहे. त्यामुळे मानवी वेदनांवर त्याचा असा काही असर होतो, की सगळी दुःखे, वेदना पार विसरायला होतात. निसर्गाचे हेच सानिध्य कायम मिळत राहिले तर मग काय मानवी जीवनात बहारच येईल. सहाजिकच त्याचा परिणामही दीर्घकाळ राहिल.

निसर्गात अहंकाराचा लवलेश नाही. म्हणूनच तो ईश्वराच्या जवळ आहे आणि त्याचमुळे आपण जेव्हा निसर्गाच्या सानिध्यात जातो, तेव्हा ईश्वराच्या जवळ गेल्याचा अनुभव येतो.

निसर्ग सुख आणि दुःखाच्या पलीकडे आहे. वसंत असो वा वर्षा वेगवेगळ्या मार्गाने ईश्वरच पृथ्वीवरून हात फिरवत असतो. आणि त्याच्या या चैतन्यदायी स्पर्शाने सृष्टी फुलून निघते.

जीवनात प्रभू स्पर्श झाला, त्याचा हात फिरला तर आपले जीवनही संपूर्णपणे बदलून जाईल. जीवनात वसंत येईल. दुःख, दैन्य, दारिद्र्य क्षणात दूर होतील. ईश्वराच्या स्पर्श झाल्यानंतर आयुष्यात फक्त एकच ऋतू येतो, तो म्हणजे वसंत.

निसर्गाच्या सानिध्यात राहिल्यास शरीरात स्फूर्ती, मनात उत्साह आणि बुद्धीत चमक व हृदयात चेतना निर्माण होते. सर्व सृष्टी चेतनामय वाटू लागते. सृष्टीचे सौंदर्य चाखण्यासाठी दोन डोळेही कमी पडतात, असे वाटते. कदाचित म्हणूनच की काय या काळात विवाह समारंभ होतात आणि विवाह करून आणखी दोन डोळ्यांच्या सहाय्याने आपण या सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घेत असू.

सृष्टीचे सौंदर्य आणि युवावस्था एकत्र येथे तिथून निराशा, निष्क्रियता, नीरसता हद्दपार होते. निसर्गाच्या सौंदर्यात व मानवी रसिकतेत ईश्वराचा स्वर न मिसळल्यास मानवी रसिकता विलासी जीवनाचा मार्ग पकडते आणि विनाशाच्या गर्तेत घेऊन जाते. म्हणूनच वसंताच्या संगीतात गीतेचा स्वर मिळायला हवा.

वसंतोत्सव अमर आशावादाचेही प्रतीक आहे. वसंताची पूजा करणारा जीवनात कधीही निराश होत नाही. शिशिरातल्या पानगळीप्रमाणे निराशाही त्याच्या आयुष्यातून गळून जाते. निराशेने ग्रासलेल्या आयुष्यासाठी वसंत हा आशेचा किरण असतो.

पाऊस नसतानाही सृष्टीला नवपालवी फुटविण्याची ईश्वरी किमया वसंतातच साकार होते. म्हणूनच हा वसंत ज्याच्या अंगी भिनला आहे, त्याचे आयुष्य कधीही निराशेने ग्रासले जात नाही. त्याच्या जीवनात कायम वसंत नांदत असतो.

भक्ती व शक्तीच्या सुंदर सहयोगातून त्याची जीवनदृष्टीही बदलून जाते. जगणे हेच एखाद्या गाण्यासारखे त्यालावाटू लागते. जीवनातील दुःखांकडे पाहण्याची त्याची दृष्टी विधायक बनते.

महापुरुषांच्या आयुष्यात आशेलाच सिद्दीत परिवर्तित करणाऱ्या साधनेचे मोठे महत्त्व आहे. असे लोक कल्पनांच्या राज्यात भराऱ्या मारणेच नसतात, त्याचप्रमाणे रोजच्या धावपळीच्या जीवनात रसिकतेला स्थान नाही, असे म्हणणारे अरसिकही नसतात.

जीवन व वसंताला ज्याने एकरूप केले आहे, अशा व्यक्तीलाच आपली संस्कृती संत म्हणते. जो जीवनात वसंत आणतो, तोच संत असतो.

यौवन आणि संयम, संकल्प आणि सिद्धी, कल्पना आणि वास्तव, जीवन आणि कवन, भक्ती व शक्ती, सर्जन आणि विसर्जन या सगळ्यांचे समन्वय साधणारा आणि जीवनात सौंदर्य, संगीत व स्नेह निर्माण करणारा वसंत आपल्या जीवनात आला, त्याचवेळी आपण वसंताला पाहिले, अनुभवले आणि आपल्यात रिचवले असे म्हणता येईल.

**(साभार : वेबदुनिया)**

# राजस्थानचा दिल्लीवर ‘रॉयल’ विजय

**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर झालेल्या रोमहर्षक राजस्थान रॉयल्सने दिल्ली कॅपिटल्सचा शेवटच्या षटकात १२ धावांनी पराभव केला. त्याचबरोबर यंदाच्या हंगामातील सलग दुसरा विजय नोंदवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना रियान परागच्या नाबाद ८४ धावांच्या जोरावर राजस्थानने ५ बाद १८५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दिल्लीला ५ बाद १७३ धावांपर्यंतच मजल मारता आली.



लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दिल्लीच्या संघाने दोन गडी लवकर गमावले असले तरी ऋषभ पंत आणि डेव्हिड वॉर्नरच्या ६७ धावांच्या भागीदारीने संघाचे पुनरागमन केले. शेवटच्या पाच षटकांत दिल्लीला विजयासाठी ६६ धावांची गरज होती, मात्र संघाचे फलंदाज सातत्याने बाद होत राहिले. त्यामुळे दिल्लीला हा सामना १२ धावांनी हरला.

दिल्लीकडून फलंदाजी करताना डेव्हिड वॉर्नरने सर्वाधिक ४९ धावांची खेळी केली. याशिवाय स्टब्सने २३ चेंडूंत ४३ धावा केल्या, पण तो संघाला विजयापर्यंत नेऊ शकला नाही. राजस्थान संघाकडून बर्गर आणि युजवेंद्र चहलने प्रत्येकी दोन आणि आवेश खानने एक विकेट घेतली. आवेश खानने शेवटच्या षटकात राजस्थानसाठी अप्रतिम गोलंदाजी केली.

तत्पूर्वी नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या राजस्थान रॉयल्स संघाची सुरुवात खराब झाली. संजू सॅमसनचा संघ फलंदाजी करताना संघर्ष करताना दिसला. अवघ्या नऊ धावांच्या स्कोअरवर संघाला पहिला धक्का बसला. यशस्वी जैस्वाल केवळ पाच धावा करू शकला आणि पॅव्हेलियनमध्ये परतला. दिल्लीविरुद्ध राजस्थानने २६ धावांवर तीन विकेट गमावल्या. संघाला दुसरा धक्का जोस बटलरच्या रूपाने बसला तो केवळ ११ धावा करू शकला, तर संजू सॅमसन १५ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला.

यानंतर रविचंद्रन अश्विन पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने रियान परागसोबत चौथ्या विकेटसाठी ५४ धावांची भागीदारी केली. अश्विनने या सामन्यात १९ चेंडूंचा सामना करीत २९ धावा केल्या. यानंतर ध्रुव जुरेलनेही २० धावांची जलद खेळी केली. त्याने १२ चेंडूंचा सामना करताना तीन चौकार मारले. सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या शिमरॉन हेटमायर याने रियान परागसोबत ४३ धावांची नाबाद भागीदारी केली. या सामन्यात हेटमायर १४ धावा करून नाबाद राहिला. त्याचवेळी परागच्या झंझावाती खेळीमुळे राजस्थानची धावसंख्या १८०च्या पुढे गेली. त्याने ४५ चेंडूंचा सामना करीत सात चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने नाबाद ८४ धावा केल्या.

आतापर्यंतच्या आयपीएलमधील रियान परागची सर्वोच्च खेळी आहे. त्याने शेवटच्या षटकात त्याने एनरिच नॉर्खियाला लक्ष्य केले आणि २५ धावा केल्या. या खेळीसाठी त्याला सामनावीराचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. दिल्लीकडून खलील अहमद, मुकेश कुमार, एनरिच नॉर्खिया, अक्षर पटेल आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

## ज्युनिअर मुलांची क्रिकेट निवड चाचणी लोधिवलीला

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचा ज्युनिअर (१६ वर्षांखालील) मुलांचा क्रिकेट संघ निवडण्यासाठी १ व २ एप्रिल रोजी खालापूर तालुक्यातील लोधिवली येथे निवड चाचणी घेण्यात येणार आहे.

लोधिवली येथील अंबानी स्कूल मैदानावर ही निवड चाचणी होणार आहे. या चाचणीतून रायगड जिल्ह्याचा १६ वर्षांखालील मुलांचा संघ निवडण्यात येईल. हा संघ महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आमंत्रितांच्या स्पर्धेत सहभागी होईल, अशी माहिती रायगड



जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.

रायगड जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या खेळाडूंनाच या निवड चाचणीत भाग घेता येईल. त्यासाठी आधार कार्ड आणि वयाचा दाखला सादर करावा लागेल. क्रिकेटचा सफेद गणवेश परिधान करून आणि स्वतःचे क्रिकेट साहित्य घेऊन खेळाडूंनी १ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता लोधिवली येथील मैदानावर हजर राहावे. निवड चाचणी शुल्क २०० रुपये आकारण्यात येणार असून १ सप्टेंबर २००८नंतर जन्मलेले खेळाडूच यात भाग घेऊ शकतील. अधिक माहितीसाठी चंद्रकांत मते (९८२२८३६४४२), प्रशांत ओक (९८२२४२२६७६), किरीट पाटील (८८९८०१५२८५) यांच्याशी संपर्क साधावा.

## मुंबईकडून खेळलेला क्रिकेटपटू अमेरिकेच्या संघात

**मुंबई** : आयपीए २०१४मधील मुंबई आणि राजस्थान यांच्यातील सामना क्रिकेटप्रेमी कधीच विसरणार नाही. या सामन्यात मुंबईसाठी मॅचविनिंग खेळी करणारा खेळाडू होता न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू कोरी अँडरसन. आता हाच अँडरसन आगामी टी-२० मालिकेत यूएसए म्हणजे अमेरिकेच्या संघाकडून खेळण्यासाठी सज्ज झाला आहे तसेच तो अमेरिकेच्या संघातूनच टी-२० वर्ल्डकप खेळणार हेदेखील जवळपास निश्चित आहे.

कॅनडाविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी अँडरसनला यूएसए संघात स्थान देण्यात आले आहे. त्याने २०१८मध्ये न्यूझीलंडसाठी शेवटचा सामना खेळला होता. त्यानंतर तो क्रिकेटमध्ये पुनरागमन करीत आहे.

## राजस्थानकडून प्रसिध कृष्णाच्या जागी द.आफ्रिकेचा केशव महाराज करारबद्ध

**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएलमधील राजस्थान रॉयल्स संघाने आपल्या संघात एक मोठा बदल केला आहे. दुखापतीमुळे या हंगामातून बाहेर पडलेल्या प्रसिध कृष्णाच्या जागी त्यांनी दक्षिण आफ्रिकेचा स्टार गोलंदाज केशव महाराज या खेळाडूला संघात स्थान दिले आहे. आतापर्यंत हा खेळाडू या लखनऊ सुपर जायंट्स संघाचा भाग होता, पण आता हा खेळाडू राजस्थान रॉयल्सच्या कॅम्पमध्ये दिसणार आहे.

या हंगामाच्या सुरुवातीला केशव महाराज लखनऊ सुपर जायंट्स संघाचा सदस्य होता. तो एसए ट्वेन्टी लीगमध्ये सुपर जायंटसाठीदेखील खेळतो, परंतु त्याला आयपीएलमधील अधिकृत संघाचा भाग बनवण्यात आले नव्हते. तो फक्त हंगामात संघासोबत प्रशिक्षण घेत होता. अशा परिस्थितीत तो खेळाडू म्हणून लखनऊ संघाचा भाग नव्हता, मात्र आता राजस्थान रॉयल्सच्या वतीने त्याला मूळ किंमत ५० लाख रुपये देऊन



बदली खेळाडू म्हणून आपल्या संघात दाखल करून करारबद्ध केले आहे. तो गोलंदाजीसह चांगल्या प्रकारे फलंदाजी करू शकतो. त्यामुळे तो राजस्थानसाठी उपयुक्त ठरू शकतो.

डावखुरा फिरकी गोलंदाज केशव महाराजने गेल्या वर्षी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारतीय खेळपट्ट्यांवर चांगलाच धुमाकूळ घातला होता. जिथे त्याने १० सामन्यांत पाचपेक्षा कमी इकॉनॉमीने १५ बळी घेतले. या वर्षाच्या सुरुवातीला एसए ट्वेन्टी लीगमध्ये केशवने सुपर जायंट्स फ्रँचायझीकडून खेळताना १३ सामन्यांत १५ बळी घेतले. राजस्थान रॉयल्स संघाने मोसमाची चांगली सुरुवात केली असून त्यांनी सलग दोन सामन्यांत विजय मिळविला आहे.

### अल्लाह गझनफर ‘केकेआर’च्या ताफ्यात

**कोलकाता** : आयपीएलमधील



संघ कोलकाता नाईट रायडर्सने जखमी मुजीब उर रहमानच्या जागी अल्लाह गझनफरची निवड केली आहे. गझनफरने दोन वनडे सामन्यांमध्ये अफगाणिस्तानचे प्रतिनिधित्व केले आहे. या युवा खेळाडूने तीन ट्वेंटी-२० आणि सहा प्रथम श्रेणी सामने खेळले असून त्याच्या नावावर अनुक्रमे पाच आणि चार बळींची नोंद आहे. त्याला केकेआरने २० लाख रुपयांच्या मूळ किमतीत खरेदी केले.

## दिल्लीचा प्रशिक्षक पॉंटिंगने घातला पंचाशी वाद

**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये गुरुवारी झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने दिल्ली कॅपिटल्सचा पराभव केला. यंदाच्या आयपीएल हंगामात दिल्ली संघाला सलग दुसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. दुसऱ्या सामन्यादरम्यान एक गोंधळ पाहायला मिळाला. यानंतर दिल्लीचा प्रशिक्षक रिकी पॉंटिंग पंचाशी वाद घालताना दिसला. त्यामुळे काही वेळासाठी सामना थांबवण्यात आला होता.

दिल्ली कॅपिटल्सच्या डावातील पहिल्या षटकात राजस्थान रॉयल्सचा खेळाडू रोव्हमन पॉवेल मैदानात पोहेचला तेव्हा ही घटना घडली. तथापि, राजस्थानने आधीच शिमरॉन हेटमायरच्या जागी नांद्रे बर्गरची प्रभावशाली खेळाडू म्हणून निवड केली होती. अशा परिस्थितीत जेव्हा पॉवेल मैदानावर दिसला, तेव्हा दिल्ली संघाचा कोच रिकी पॉंटिंगने डगआउटमधून आक्षेप घेतला. पॉवेल रियान परागच्या जागी पर्यायी खेळाडू म्हणून आला होता. पॉंटिंगला वाटले की तो पाचवा विदेशी खेळाडू म्हणून आला आहे. त्यामुळे त्याने पंचांशी वाद घालण्यास सुरुवात केली, मात्र पंच नितीन मेनन यांनी रिकी पॉंटिंगला समजावून हे प्रकरण शांत केले.

## ऋषभ पंतचे अनोखे शतक

### दिल्ली कॅपिटल्ससाठी शंभर सामने खेळणारा ठरला पहिला खेळाडू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सविरुद्ध सामना खेळायला उतरताच दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार ऋषभ पंत हा विराट कोहली आणि गौतम गंभीर यांच्या खास क्लबमध्ये दाखल झाला. यासह पंत हा आयपीएलमध्ये १०० सामने खेळणाऱ्या खेळाडूंच्या यादीत सामील झाला आहे. विशेष म्हणजे दिल्लीकडून अशी कामगिरी करणारा तो पहिला खेळाडू आहे.



याआधी दिल्ली फ्रँचायझीसाठी कोणताही खेळाडू आयपीएलमध्ये १०० सामने खेळू शकलेला नाही. या वेळी दिल्ली कॅपिटल्स संघाकडून ऋषभ पंतला १०० क्रमांकाची जर्सी भेट देण्यात आली.

या सामन्यासह ऋषभ पंत केवळ दिल्ली कॅपिटल्ससाठी १०० सामने खेळणारा खेळाडू बनला नाही, तर त्याने विराट कोहली आणि गौतम गंभीर यांच्या क्लबमध्येही स्थान मिळवले. वास्तविक, दिल्ली कॅपिटल्सकडून १००वा सामना खेळणारा पंत हा पहिला खेळाडू ठरला आहे. विराट कोहली आणि गौतम गंभीर हे अनुक्रमे रॉयल चॅलेंजर्स बंगलोर आणि कोलकाता नाईट रायडर्ससाठी १०० सामने खेळणारे पहिले खेळाडू आहेत. पंत कोणत्याही फ्रँचायझीसाठी १००वा सामना खेळणाऱ्या पहिल्या खेळाडूंच्या यादीत दाखल झाला आहे.

## भारताचे नितीन मेनन सलग पाचव्यांदा विशेष पंच श्रेणीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या नितीन मेनन यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) विशेष पंच श्रेणीत (एलिट पॅनल) तब्बल पाचव्यांदा स्थान मिळाले आहे तसेच शरफुद्दौला इब्ने शाहीद यांचाही विशेष पंच श्रेणीत समावेश करण्यात आला असून हे यश मिळवणारे ते बांगलादेशचे पहिले पंच ठरले आहेत.

इंदूरस्थित मेनन यांना २०२०मध्ये प्रथम आयसीसीच्या विशेष पंच श्रेणीत स्थान मिळाले होते. त्यानंतर त्यांनी सलग पाचव्यांदा या श्रेणीतील आपले स्थान राखले आहे. एकूण १२ पंचांचा या विशेष श्रेणीत समावेश असून यात मेनन हे एकमेव भारतीय आहेत. ४० वर्षीय मेनन यांनी आतापर्यंत २३ कसोटी, ५८ एकदिवसीय आणि ४१ ट्वेन्टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत पंचाची भूमिका बजावली आहे.

पंच म्हणून एकूण १२२ आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव



असलेले मेनन आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेदरम्यान एस. वेंकटराघवन यांचा १२५ सामन्यांचा विक्रम मोडू शकतील. मेनन यांनी गेल्या वर्षी अ‍ॅशेस मालिकेतही पंच म्हणून काम केले होते. मेनन यांच्यापूर्वी भारताकडून एस. रवी आणि वेंकटराघवन यांनाच विशेष पंच श्रेणीत स्थान मिळवता आले होते.

**विशेष श्रेणीतील पंच**

नितीन मेनन (भारत), कुमार धर्मसेना (श्रीलंका), ख्रिस्तोफर गॅफनी (न्यूझीलंड), मायकल गॉफ (इंग्लंड), अ‍ॅड्रियन होल्डस्टॉक (दक्षिण आफ्रिका), रिचर्ड इलिंगवर्थ (इंग्लंड), रिचर्ड केटलब्रो (इंग्लंड), अहसान रझा (पाकिस्तान), पॉल रायफल (ऑस्ट्रेलिया), शरफुद्दौला इब्ने शाहीद (बांगलादेश), रॉड टकर (ऑस्ट्रेलिया), जोएल विल्सन (वेस्ट इंडिज).

**विशेष श्रेणीतील सामनाधिकारी**

जवागल श्रीनाथ (भारत), डेव्हिड बून (ऑस्ट्रेलिया), जेफ क्रो (न्यूझीलंड), रंजन मदुगले (श्रीलंका), अँडी पायक्रॉफ्ट (झिम्बाब्वे), रिची रिचर्डसन (वेस्ट इंडिज).

## मुंबईच्या खेळाडूंसोबत फोटो काढून प्रसिद्धी मिळवणारी ‘मिस्ट्री गर्ल’ कोण?

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सचा संघ त्यांच्या खराब कामगिरीमुळे टीकाकारांच्या निशाण्यावर आहे. मुंबईला आपल्या सुरुवातीच्या दोन सामन्यांमध्ये पराभव पत्करावा लागला. अशातच मुंबईच्या खेळाडूंचे एका मिस्ट्री गर्लसोबतचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

या मिस्ट्री गर्लने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये मुंबईचे शिलेदार दिसत आहेत. मुंबईच्या खेळाडूंसोबत दिसणाऱ्या तरुणीचे नाव सेजल जैस्वाल असे आहे. तिने अनेक फोटो आणि व्हिडीओ



शेअर केले आहेत. ती रोहित शर्मापासून प्रशिक्षक लसिथ मलिंगासोबत फोटो काढताना दिसली. याशिवाय मुंबईचा कर्णधार हार्दिक पांड्या, टीम डेव्हिड, पियुष चावला, तिलक वर्मा, जसप्रीत बुमराहसह इतरही खेळाडूंसोबत सेजलने फोटो काढले.

सेजल ही अभिनेत्री आहे. ‘दिल मांगे मोर’ आणि ‘डेटिंग इन द डार्क’ यांसारख्या टीव्ही मालिकांमध्ये तिने काम केले आहे. सेजल शालेय जीवनापासून अभिनय क्षेत्रात सक्रिय आहे. तिने वयाच्या १९व्या वर्षापासून मॉडेलिंगला सुरुवात केली होती. तिचे इन्स्टाग्राम अकाउंट ग्लॅमरस फोटोंनी भरलेले आहे. तिने अनेक सेलिब्रिटींसोबत फोटो काढले आहेत.

## हार्दिक पांड्याने लसिथ मलिंगाला बाजूला ढकलले

### व्हिडीओ व्हायरल; चाहते संतापले

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सचा नवा कर्णधार हार्दिक पांड्या सध्या आयपीएलमध्ये चर्चेचा केंद्रबिंदू आहे. पांड्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यामुळे तो पुन्हा एकदा वादात सापडला आहे. या व्हिडीओमध्ये पांड्या संघाचा गोलंदाजी प्रशिक्षक लसिथ मलिंगाला धक्का देत असल्याचे चाहत्यांचे मत आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने चाहते पांड्याला ट्रोल करीत आहेत.



सनरायझर्स हैदराबाद आणि मुंबई इंडियन्स यांच्यात झालेल्या सामन्यानंतर ही घटना घडली. सामना संपल्यावर दोन्ही संघांचे खेळाडू एकमेकांशी हस्तांदोलन करीत असताना मुंबई इंडियन्सचा गोलंदाजी प्रशिक्षक लसिथ मलिंगा हस्तांदोलन आणि मिठी मारण्यासाठी हार्दिक पांड्याकडे गेला, पण त्या वेळी पांड्या हा मलिंगाला बाजूला ढकलताना दिसला. पांड्याने मलिंगाशी हस्तांदोलन केले नाही आणि त्याच्याकडे दुर्लक्ष करताना दिसला. या वेळी मलिंगाचा चेहराही उदास दिसत होता. यानंतर हार्दिक पांड्या इतर खेळाडूंशी हस्तांदोलन करून पुढे निघून गेला.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com